दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २९७ I सोमवार १० ऑगस्ट २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## शेततळ्यात बुडून आजोबा-नातवाचा मृत्यू




**संगमनेर :** तालुक्यातील सावरगाव तळ येथे रविवारी सायंकाळी शेततळ्यात बुडून पांडुरंग रखमा गुळवे (वय ६५ वर्षे) आणि श्रवेश संतोष गुळवे (वय १३ वर्षे) हे दोघेही रविवारी सायंकाळी साडेपाच ते सहा वाजेच्या सुमारास शेततळ्यामध्ये बुडाले. या दुर्घटनेत दोघांचाही दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर संबंधित यंत्रणेला घटनेची माहिती देण्यात आली. दोघांचे मृतदेह शेततळ्यातून बाहेर काढण्यात आले असून, पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू असल्याची प्राथमिक माहिती आहे. या दुर्दैवी घटनेमुळे गुळवे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, सावरगाव तळ परिसरात शोककळा पसरली आहे.

# जखमी मनपा कर्मचाऱ्याचा अखेर मृत्यू

## मुकुंदनगरमधील हल्ला प्रकरण : शहरात संतापाची लाट

### हिंदुत्ववादी संघटनांचा बंद : आ. जगताप, आ. कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको आंदोलन





**हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी मॅक केअर हॉस्पिटल परिसरात ठिय्या मांडला. यावेळी आ. संग्राम जगताप, आ. अक्षय कर्डीले उपस्थित होते. तसेच हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी अहिल्यानगर शहरात फिरून शांततेच्या मार्गाने बंदचे आवाहन केल्यामुळे सर्वत्र बंद पुकारण्यात आला होता. शहरात ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणवर पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. (छाया : राजू खरपुडे , नगर)**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर : मुकुंदनगर परिसरातील दर्गादायरा कब्रस्तानाजवळ कर्तव्य बजावत असताना अहिल्यानगर महानगरपालिकेच्या विद्युत विभागातील कंत्राटी कर्मचारी धीरज परदेशी यांच्यावर झालेला जमावाचा जीवघेणा हल्ला अखेर त्यांच्या मृत्यूचे कारण ठरला. परदेशी यांच्या मृत्यूनंतर शहरात संतापाची लाट उसळली. हिंदुत्ववादी संघटनांनी बंदचे आवाहन केले तर आ. संग्राम जगताप आणि आ. अक्षय कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली आंदोलकांनी रास्ता रोको आंदोलन केले.**

शुक्रवारी (७ ऑगस्ट) सायंकाळी १० ते १५ जणांच्या जमावानं केलेल्या बेदम मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या परदेशी यांची गेल्या तीन दिवसांपासून मृत्यूशी झुंज सुरू होती. मात्र, आज दुपारी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने अहिल्यानगर शहर हादरले. या घटनेचे वृत शहरात वाऱ्यासारखे पसरले. दरम्यान हिंदुत्ववादी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी शहरातील प्रमुख बाजारपेठेत बंदचे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देऊन शहरातील व्यापाऱ्यांनी उस्फूर्तपणे आपापली दुकाने बंद करून बंदला प्रतिसाद दिला.

दरम्यान, मृत धीरज परदेशी यांचा मृतदेहा शिवविच्छेदन करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात नेण्यात आला. आमदार संग्राम जगताप आमदार अक्षय कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली हिंदुत्ववादी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी जुन्या बस स्थानका जवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ रास्ता रोको आंदोलन सुरू केले. या गुन्ह्यातील आरोपींची घरे तात्काळ जमीनदस्त करा मृतदेहाचे ज्या ठिकाणी मारहाण झाली त्याच ठिकाणी अंत्यविधी करण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली या आंदोलनामुळे शहरात सर्वत्र तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मुकुंदनगर परिसरातील कब्रस्तानात विद्युत पोलचं काम सुरू असताना ही धक्कादायक घटना घडली. कर्तव्य बजावत असलेल्या धीरज परदेशी यांच्यावर अचानक जमावाने हल्ला चढवला. लाथाबुक्क्यांसह विविध साधनांनी त्यांना जबर मारहाण करण्यात आली. या हल्ल्यात त्यांच्या डोक्यासह शरीराच्या विविध भागांवर गंभीर दुखापत झाली. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. गंभीर अवस्थेत परदेशी यांना तातडीनं खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न करूनही अखेर त्यांचा जीव वाचवण्यात यश आले नाही.धीरज परदेशी यांच्यावर एवढा अमानुष हल्ला नेमका कोणत्या कारणातून करण्यात आला? याचा उलगडा अद्याप झालेला नाही. विद्युत पोलचे काम सुरू असतानाच हा हल्ला झाल्याने कामावरून वाद झाला होता का? यासह अन्य शक्यतांचा पोलीस तपास करत आहेत. हल्ल्यात सहभागी असलेल्या प्रत्येकाची भूमिका तपासली जात आहे. या घटने मागील मास्टर माईंड कोण आहे का ? याचा पोलीस शोध घेत आहेत. **(पान ४ वर)**

### चार आरोपींना अटक

भिंगार कॅम्प पोलिसांनी तपासाची चक्रे वेगानं फिरवत कारवाई सुरू केली. पोलिसांनी काल रात्री युनूस शेख, मेहराज सय्यद, सिराज सय्यद आणि मुस्तकीम सय्यद या चार आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणातील इतर आरोपींचा शोध सुरू असून, हल्ल्यात सहभागी असलेल्या सर्वांवर कठोर कारवाई करण्याच्या दिशेने पोलिसांचा तपास सुरू आहे.

### पालकमंत्री विखे, आ. जगतापांसह लोकप्रतिनिधी रुग्णालयात

धीरज परदेशी यांच्या मृत्यूची माहिती मिळताच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आ. संग्राम जगताप, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे आणि आ. मोनिका राजळे यांनी रुग्णालयात भेट देऊन परदेशी यांच्या कुटुंबीयांची विचारपूस केली. दोषींवर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. गेल्या दोन-तीन दिवसांपासून आ. संग्राम जगताप हे परदेशी यांच्या प्रकृतीची माहिती घेत होते. तसेच आरोपींना तातडीनं अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली होती. रुग्णालयातही त्यांनी उपस्थित राहून कुटुंबीयांना धीर दिला.

### जिथे मारहाण झाली, तिथेच अंत्यविधी करा

धीरज परदेशी यांच्या पत्नीनं अत्यंत संतप्त मागणी केली आहे. 'माझ्या पतीला ज्या कब्रस्तानात मारहाण करण्यात आली, त्याच कब्रस्तानात त्यांचा अंत्यविधी करण्यात यावा', अशी मागणी त्यांनी केली आहे. या मागणीमुळे घटनेचे गांभीर्य आणखी वाढलं असून, प्रशासनासमोर मोठं आव्हान उभं राहिलं आहे.

## ५० हजार ८०६ शेतकऱ्यांना मरणोत्तर कर्जमाफी

- कर्जमाफीच्या लाभार्थ्यांमध्ये अमरावती, मराठवाडा आघाडीवर
- १४ लाख शेतकरी योजनेतून वगळले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** राज्य सरकारच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत तब्बल ५० हजार ८०६ शेतकऱ्यांना मरणोत्तर कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे. विशेष म्हणजे, या लाभार्थ्यांमध्ये शेतकरी आत्महत्याग्रस्त अमरावती आणि मराठवाडा विभागातील शेतकऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. दुसरीकडे लोकप्रतिनिधी, सरकारी व निमसरकारी कर्मचारी यांच्यासह सुमारे १४ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या योजनेतून वगळण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

राज्य सरकारने कर्जबाजारी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सुमारे ३६ हजार कोटी रुपयांची कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जाणार आहे. **(पान ४ वर)**

## अन् महिलेला पोर्तुगालमध्ये विकले!

### विदेशात नोकरीचे आमिष देत ११ लाख उकळले...

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** युरोपमध्ये मोठ्या पगाराच्या नोकरीचे आमिष दाखवून नागपूरच्या एका महिलेला पुण्यातील कथित कंपनी संचालकांनी अकरा लाख रुपये उकळले. तिच्याकडूनच पैसे घेऊन तिला चक्क पोर्तुगालमध्ये विकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तब्बल महिनाभर छळ सहन केल्यानंतर या महिलेने




स्वतःची सुटका करून घेत पुन्हा पुणे गाठले आणि नंतर पोलिसांकडे तक्रार नोंदवली. मानवी तस्करी आणि लैंगिक शोषणाच्या या खळबळजनक प्रकरणात पुणे पोलिसांनी तपास केल्यानंतर धक्कादायक माहिती उघडकीस आली. देश विदेशातील अनेकांना विदेशात विकणाऱ्या या टोळीचे चार सदस्य पुण्यातील तर चार सदस्य पोर्तुगालमधील आहेत. पीडित महिला २८ वर्षांची आहे. ती जॉब सर्चिंग करीत असताना डिसेंबर २०२५ मध्ये इंस्टाग्रामवर पुण्यातील विमान नगर परिसरातील 'वी मायग्रेट' नावाच्या कन्सल्टन्सीची तिला माहिती मिळाली. संपर्क केल्यावर एजन्सीने तिला पोर्तुगालमध्ये कॅशिअरच्या नोकरीचे आमिष दाखवले. दरमहा १.५ लाख रुपये पगार आणि दररोज फक्त ८ तासांचे काम, असे सांगण्यात आले. नोकरीसाठी विविध प्रक्रियेकरिता तिच्याकडून टप्प्याटप्प्याने ११ लाख रुपये उकळण्यात आले. धक्कादायक म्हणजे, नंतर आरोपींनी तिची पोर्तुगालमधील एका बिअर शॉपच्या मालकाला विक्री केली. तिथे तिच्याकडून जबरदस्तीने नको ते काम करून घेण्यात आले. जेव्हा महिलेने याचा विरोध केला, तेव्हा मालकाने तिला 'तुला खरेदी करण्यासाठी मी भारतातील एजंट्सना पैसे दिले आहेत' असे सांगितले. या घटनेने हादरलेल्या महिलेने आपल्या पतीशी संपर्क साधून आपण फसवले गेलो, याची माहिती दिली. पतीने तिला दिलासा देऊन तेथून बाहेर पडण्याचा सल्ला दिला.

### मानवी तस्करी करणाऱ्या रॅकेटचा भांडाफोड

महिनाभर सदरील महिलेने जीवनयातना भोगल्यानंतर तिने आपली सुटका करून देश गाठला. आणि तक्रार करून तरुण-तरुणीची मानवी तस्करी करणाऱ्या रॅकेटचा भांडाफोड केला. पीडितेने पुणे गुन्हे शाखेशी संपर्क साधला. त्यानंतर गुन्हे शाखेने पुणे विमानतळ पोलिस ठाण्यात ८ आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला. प्रतिभा भाटी, अनिलकुमार, अजहर शेख, वामसी, चैतन्य, हिम्मत सिंग आणि कपिल मिश्रा अशी आरोपींची नावे आहेत. पोलीस सध्या या आंतरराष्ट्रीय मानवी तस्करी रॅकेटचा तपास करत असून, अनेक धक्कादायक खुलासे होण्याची शक्यताही पोलिसांनी वर्तविली आहे.

## विमानतळावर नोकरीसाठी बोगस परीक्षा..?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संभाजीनगर :** वैद्यकीय प्रवेशासाठी महत्त्वाची आणि अनिवार्य असलेल्या नीट परीक्षेचा पेपर फुटल्यानंतर देशभरातून संताप व्यक्त करण्यात आला. त्यानंतर, जंतरमंतरवर झालेल्या आंदोलनात देशभरातील तरुणाईचा सक्रीय सहभाग पाहायला मिळाला. त्यातूनच, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पदाचा राजीनामाही द्यावा लागला. मात्र, अद्यापही परीक्षा आणि नोकरीवरुन उमेदवारांची फसवणूक सुरूच असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, सीजेपीचे नेतृत्व करणारे अभिजीत दीपके राहत असलेल्या छत्रपती संभाजीनगरमध्ये नोकरीच्या आमिषाने हजारो युवकांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विमानतळावर आकर्षक नोकरी देण्याचे आमिष दाखवत एका खासगी कंपनीने महाराष्ट्रातील हजारो सुशिक्षित बेरोजगारांना गंडा घातल्याचा आरोप करण्यात येत आहे. शासकीय भरतीप्रमाणेच पारदर्शक प्रक्रिया असल्याचा देखावा निर्माण करून प्रत्येक विद्यार्थ्याकडून **(पान ४ वर)**

**संभाजीनगरमध्ये हजारो उमेदवारांची फसवणूक**

## गोदावरीच्या बॅकवॉटरमध्ये बुडून दोन चिमुरड्यांचा मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** घरासमोर खेळत असताना कुटुंबीयांची नजर चुकवून बाहेर गेलेल्या दोन चिमुरड्यांचा गोदावरी नदीच्या बॅकवॉटरमध्ये बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना रविवारी दुपारी गंगापूर तालुक्यातील अमळनेर वस्ती येथे घडली. आयुश रवींद्र मिसाळ (वय ३) आणि तनवी अविनाश मिसाळ (वय २) अशी मृत बालकांची नावे आहेत. या घटनेने संपूर्ण अमळनेर वस्तीवर शोककळा पसरली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, अमळनेर वस्ती येथील दिलीप मिसाळ यांचा नातू आयुश आणि नात तनवी हे दोघेही रविवारी दुपारी घरासमोर खेळत होते. खेळता खेळता कुटुंबीयांची नजर चुकवून दोन्ही चिमुरडे घरापासून दूर गेले. काही वेळाने मुले दिसत नसल्याचे लक्षात येताच कुटुंबीयांनी परिसरात त्यांचा शोध सुरू केला. कुटुंबीयांकडून शोधाशोध सुरू असतानाच सुमारे तासाभरानंतर दोन्ही चिमुरडे गोदावरी नदीच्या बॅकवॉटरमधील पाण्यात आढळून आले. त्यांना तातडीने गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर दोन्ही बालकांना मृत घोषित केले. आयुश हा रवींद्र मिसाळ यांचा एकुलता एक मुलगा, तर तनवी ही अविनाश मिसाळ यांची एकुलती एक मुलगी होती. त्यामुळे दोन्ही कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. चिमुरड्यांच्या अकाली मृत्यूने नातेवाईकांचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा होता.

सायंकाळी पाच वाजता अमळनेर वस्ती येथे शोकाकुल वातावरणात दोन्ही चिमुरड्यांवर अंत्यसंस्कार करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी मिसाळ कुटुंबीयांच्या घरी धाव घेत त्यांचे सांत्वन केले. अवघ्या दोन-तीन वर्षांच्या चिमुरड्यांचा असा दुर्दैवी अंत झाल्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## नाशिक-पुणे सरळ रेल्वेसाठी हजारोंचा एल्गार; तीन तास चक्काजाम

### 'जेथे काम थांबले तेथूनच सुरू करा' : बाळासाहेब थोरात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** नाशिक-पुणे सरळ रेल्वे मार्गाच्या मागणीसाठी संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पावसा येथे हजारो नागरिकांनी एकत्र येत तीन तास भव्य रास्ता रोको आंदोलन केले. महिला, युवक, विद्यार्थी, शेतकरी आणि सर्वपक्षीय नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे परिसर घोषणांनी दुमदुमून गेला. आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक विस्कळीत होऊन वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. रिमझिम पावसातही नागरिक तीन तास ठिय्या देऊन आंदोलनात सहभागी झाले.



काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केंद्र व राज्य सरकारने नाशिक-पुणे सरळ रेल्वे मार्गाचे काम जेथे थांबवले आहे, तेथूनच पुन्हा सुरू करावे, अशी मागणी केली. या प्रकल्पासाठी केंद्र सरकार, नीती आयोग, राज्य सरकार आणि रेल्वे विभागाच्या मंजुरी मिळाल्या असून, राज्य सरकारने रेल्वेला एक हजार कोटी रुपये दिल्यानंतर भूसंपादनाची प्रक्रियाही सुरू झाली होती. **(पान ४ वर)**

### आ. सत्यजित तांबेंच्या अटकेची बातमी कळताच आंदोलन आक्रमक

नाशिक - पुणे सरळ रेल्वे मार्गासाठी आ. सत्यजित तांबे यांच्या नेतृत्वाखाली समृद्धी महामार्गावर शांततेच्या मार्गाने आंदोलन सुरू होते. संगमनेर, सिन्नर, नारायणगाव, आळेफाटा, चाकण या सर्व ठिकाणी सुरू असलेल्या आंदोलनाची दखल सर्व माध्यमांनी घेतली. केंद्र सरकारपर्यंत या आंदोलनाची धग पोहोचल्यानंतर आमदार सत्यजित तांबे यांना अटक करण्यात आली. ही बातमी माध्यमांवर झळकल्यानंतर संगमनेर मधील आंदोलकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला. यावेळी प्रचंड घोषणाबाजी झाली. याचबरोबर आंदोलन स्थळी कार्यकर्ते अधिक आक्रमक झाले.

## दारूच्या पैशांसाठी आईचा खून

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मृतदेह घरात ठेवून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न**

**भोर :** दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याच्या रागातून मुलाने स्वतःच्या आईवर लोखंडी रॉडने हल्ला करून तिची हत्या केल्याची धक्कादायक घटना भोर तालुक्यातील वेळवंड खोऱ्यातील म्हाळवडी येथे घडली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, पोलिसांनी संशयित आरोपी मुलगा समीर काळू मालुसरे याला ताब्यात घेतले आहे. या हल्ल्यात बेबी काळू मालुसरे यांचा मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, समीर मालुसरे याने आई बेबी यांच्याकडे दारू पिण्यासाठी पैसे मागितले होते. मात्र, त्यांनी पैसे देण्यास नकार दिल्याने समीर संतापला. रागाच्या भरात त्याने लोखंडी रॉडने आईच्या डोक्यात व तोंडावर वार केले. गंभीर दुखापत झाल्याने बेबी मालुसरे यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर समीरने आईचा मृतदेह घरातच ठेवला आणि घराला बाहेरून कुलूप लावले. त्यामुळे घटना दाबण्याचा प्रयत्न असल्याचा संशय नागरिकांनी व्यक्त केला. आरोपी मुलाने शेजाऱ्यांना आई गावाला गेल्याचे सांगितल्याने काही काळ घटनेची माहिती मिळाली नाही. काही तासांनंतर समीर पुन्हा घराजवळ आला. **(पान ४ वर)**

# लोकसेवकच असुरक्षित तर समाज सुरक्षित कसा?

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

अहिल्यानगरमधील महानगरपालिकेचे कंत्राटी कर्मचारी धीरज परदेशी यांच्यावर कर्तव्य बजावत असताना झालेला जीवघेणा हल्ला आणि त्यानंतर झालेला त्यांचा मृत्यू ही केवळ एका कर्मचाऱ्याच्या कुटुंबाची शोकांतिका नाही; ती आपल्या सामाजिक व्यवस्थेच्या संवेदनशीलतेची परीक्षा आहे. नागरिकांना सेवा देण्यासाठी मैदानात उतरलेल्या कर्मचाऱ्यालाच जमावाच्या हिंसाचाराला बळी पडावे लागते, ही बाब कोणत्याही सुसंस्कृत समाजाला शोभणारी नाही. या घटनेनंतर शहरात उमटलेला संताप स्वाभाविक असला तरी तो कायदा हातात घेण्याकडे वळता कामा नये. एका अन्यायाचा निषेध दुसऱ्या अन्यायाने होऊ शकत नाही.

धीरज परदेशी यांच्यावर नेमक्या कोणत्या कारणातून हल्ला झाला, त्यामागे पूर्ववैमनस्य होते का, कामावरून वाद झाला का किंवा अन्य काही कारण होते का, याचा अंतिम निर्णय तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेतूनच व्हायला हवा. आरोपींना अटक झाली असली तरी सर्व दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई होणे आणि तपास पारदर्शकपणे होणे, हीच समाजाची खरी अपेक्षा आहे.

मात्र परदेशी यांच्या घटनेपलीकडे पाहिले तर चित्र अधिक चिंताजनक आहे. गेल्या काही वर्षांत डॉक्टर, परिचारिका, रुग्णालयातील कर्मचारी, वीज कर्मचारी, महापालिका कर्मचारी आणि इतर सार्वजनिक सेवकांवरील हल्ल्यांच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. महाराष्ट्रात वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांवरील हल्ल्यांची स्थिती तर विशेष चिंताजनक आहे. महावितरणने दिलेल्या माहितीनुसार, २०२३ च्या अखेरीपासून फेब्रुवारी २०२४ पर्यंत अवघ्या पाच महिन्यांत पश्चिम महाराष्ट्रात कर्मचाऱ्यांवरील हल्ल्याच्या १३ घटना नोंदल्या गेल्या; त्यापैकी सहा घटना पुणे परिसरातील होत्या.

नाशिकमध्येही २०२३ मध्ये वीज कर्मचाऱ्यांवर हल्ल्याच्या घटना घडल्या. मार्च २०२३ मध्ये कर्तव्य बजावत असलेल्या महावितरणच्या तंत्रज्ञाला मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. २०२४ मध्ये नाशिक रोड परिसरात वीज बिलाच्या थकबाकीवरून कर्मचाऱ्यांवर हल्ला झाल्याची घटना समोर आली. जानेवारी २०२५ मध्ये ठाणे जिल्ह्यात थकीत वीजबिलाच्या वसुलीसाठी गेलेल्या महावितरण कर्मचाऱ्याला मारहाण करण्यात आली. म्हणजेच 'सेवा द्या, पण आमच्या इच्छेविरुद्ध काही करू नका' अशी धोकादायक मानसिकता वाढताना दिसते.

आरोग्य क्षेत्राची परिस्थिती तर अधिकच गंभीर आहे. २०२६ मध्ये डोंबिवलीतील महापालिका रुग्णालयात डॉक्टर आणि परिचारिकांवर झालेल्या हल्ल्याने महाराष्ट्रातील वैद्यकीय क्षेत्रात संतापाची लाट उसळली. त्यानंतर राज्यभरातील डॉक्टरांनी आंदोलनाचा इशारा दिला. याआधी २०२४ मध्ये मुंबईतील सायन रुग्णालयात महिला डॉक्टरवर रुग्णाच्या नातेवाइकांकडून हल्ल्याचा प्रयत्न झाला होता. त्याच वर्षी व्ही. एन. देसाई रुग्णालयात माता आणि नवजात बालकाच्या मृत्यूनंतर सुमारे २० ते २५ जणांच्या जमावाने डॉक्टर व परिचारिकांवर हल्ला केल्याचे प्रकरण नोंदले गेले.

भारतीय वैद्यकीय संघटनेच्या आधीच्या सर्वेक्षणाचा संदर्भ देताना वैद्यकीय क्षेत्रातील एका अभ्यासात नमूद करण्यात आले आहे की, देशातील ७५ टक्क्यांहून अधिक डॉक्टरांनी आपल्या कारकिर्दीत कोणत्या ना कोणत्या प्रकारची हिंसा अनुभवली आहे. हा आकडा महाराष्ट्रापुरता नसला तरी समस्या किती व्यापक आहे, याची कल्पना देतो.

मग प्रश्न असा आहे की, रुग्णालयातील डॉक्टर असो, रात्री वीज दुरुस्त करणारा कर्मचारी असो, थकीत वीजबिलासाठी नागरिकांच्या दारात जाणारा कर्मचारी असो किंवा कब्रस्तानात विद्युत पोलचे काम करणारा कंत्राटी कामगार असो, या सर्वांचा गुन्हा एवढाच की ते आपले कर्तव्य बजावत आहेत का?

सेवेत त्रुटी असेल तर तक्रार करण्यासाठी व्यवस्था आहे. डॉक्टरांच्या उपचाराबद्दल आक्षेप असेल तर वैद्यकीय मंडळ, रुग्णालय प्रशासन आणि न्यायव्यवस्था आहे. महावितरणच्या बिलाबद्दल वाद असेल तर ग्राहक तक्रार निवारणाची यंत्रणा आहे. महापालिकेच्या कामाबद्दल नाराजी असेल तर संबंधित विभागाकडे तक्रार करता येते. पण तक्रारीचे रूपांतर शिवीगाळ, धमकी, मारहाण आणि जमावाच्या हिंसाचारात होणे म्हणजे कायद्यावरील विश्वास कमकुवत होणे होय.

याहून गंभीर बाब म्हणजे या हिंसाचाराला अनेकदा जात, धर्म, भाषा आणि राजकीय ओळखीचे रंग दिले जातात. एखादा आरोपी कोणत्या समाजाचा आहे आणि पीडित कोणत्या समाजाचा आहे, यावरून संपूर्ण समाजाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे ही न्यायाची पद्धत नाही. गुन्हेगाराला त्याच्या गुन्ह्याच्या आधारावर ओळखले पाहिजे; त्याच्या जात-धर्माच्या आधारावर नव्हे. अन्यथा एका व्यक्तीच्या गुन्ह्याची शिक्षा निरपराध समाजाला देण्याची प्रवृत्ती वाढेल आणि सामाजिक दरी आणखी रुंदावत जाईल.

अहिल्यानगरमधील घटनेनंतर बंद, रास्ता रोको आणि निषेध हे लोकशाहीतील मार्ग आहेत; पण त्यातून सामान्य नागरिक, व्यापारी किंवा दुसऱ्या समाजातील व्यक्ती लक्ष्य होऊ नये, ही जबाबदारी आंदोलकांचीही आहे आणि प्रशासनाचीही. धीरज परदेशी यांच्या मृत्यूला न्याय मिळवून देण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे दोषींना कायद्याच्या चौकटीत कठोर शिक्षा मिळवून देणे, शहराला संघर्षाच्या आगीत ढकलणे नव्हे, हे देखील ध्यानात घेतले पाहिजे.

सरकारनेही या घटनांकडे केवळ प्रत्येक घटनेनंतर प्रतिक्रिया देण्याच्या भूमिकेतून पाहू नये. कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी धोकादायक ठिकाणी पोलिस संरक्षण, बॉडी कॅमेरे, आपत्कालीन संपर्क व्यवस्था, संवेदनशील भागातील सुरक्षा आणि हल्ल्यांच्या प्रकरणांसाठी जलद तपास व खटले अशी ठोस यंत्रणा उभी करणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात डॉक्टर आणि आरोग्य संस्थांच्या संरक्षणासाठी २०१० पासून स्वतंत्र कायदा अस्तित्वात आहे; तरीही हिंसाचाराच्या घटना सुरूच राहणे म्हणजे कायद्याबरोबर त्याच्या प्रभावी अंमलबजावणीचीही गरज आहे.

लोकसेवकांवर हात उचलणारा हात कोणत्याही जातीचा, धर्माचा किंवा पक्षाचा असो, तो कायद्याचा अपराधी आहे. त्याचप्रमाणे निषेधाच्या नावाखाली निरपराधांवर दबाव आणणारा जमावही लोकशाहीचा मित्र नाही. डॉक्टर सुरक्षित असतील तर रुग्ण सुरक्षित राहतील. वीज कर्मचारी सुरक्षित असतील तर शहर उजळेल. महापालिका कर्मचारी सुरक्षित असतील तर नागरी व्यवस्था चालेल. आणि प्रत्येक लोकसेवक सुरक्षित असेल तरच सामान्य नागरिक सुरक्षित राहील. हल्लेखोर कोण आहे यापेक्षा हल्ला का घडतो आहे, ही कारणे शोधण्याची वेळ आली आहे. समाजाने संताप व्यक्त करावा; पण विवेक गमावू नये. सरकारने कठोर व्हावे; पण पक्षपाती होऊ नये. आणि नागरिकांनी आपल्या हक्कांसोबत कर्तव्याचीही जाणीव ठेवावी.

कारण उद्या रस्त्यावर, रुग्णालयात, वीजखांबाजवळ किंवा आपल्या दारात उभा असलेला कर्मचारी हा 'सरकार' नसतो; तो आपल्या समाजातीलच एक माणूस असतो. त्याच्यावरचा हल्ला म्हणजे शेवटी आपल्या सार्वजनिक व्यवस्थेवर आणि आपल्या स्वतःच्या सुरक्षिततेवर झालेला हल्ला असतो.

# टोका येथील सिद्धेश्वर मंदिरात घंटा चोरीस, अज्ञात चोराविरुद्ध गुन्हा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील प्रवरासंगम-टोका येथील गोदावरी तिरावरील प्रसिध्द असलेल्या श्री सिद्धेश्वर मंदिरातील २६ किलो वजनाची मुख्य पितळी घंटा अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे.सदरचे मंदिर हे पुरातत्व खात्याच्या ताब्यात असून येथे पहाऱ्यासाठी कर्मचारी नेमलेले असतांना ही चोरी झाल्याने भाविक भक्तांमध्ये चीड व्यक्त केली जात आहे. ही घटना दिनांक ६ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री घडली.

चोरीला गेलेली पितळी घंटा ही २६ किलो वजनाची असून तिची अंदाजे किंमत ७,८०० रुपये (३०० रुपये प्रति किलोप्रमाणे) आहे. या प्रकरणी पुरातत्व संरक्षण विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे नोकरीस असलेले राहुल रमेश पवार यांनी नेवासा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. फिर्यादीवरून नेवासा पोलिसांनी अज्ञात आरोपीच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३३१ (४) व ३०५ अन्वये गु.र.क्र. ८७१/२०२६ नुसार चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

१००८ ब्रम्हलिन श्री बालब्रम्हचारी महाराज हे सिद्धेश्वर मंदिर येथे असतांना वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रम होत असत त्यावेळेस स्व:त सेवेकरी मंदिराच्या परिसराची ही देखभाल करत होते.बालब्रम्हचारी महाराज यांचे देहावसान झाल्यानंतर येथे दुर्लक्ष होत गेले. पुरातन वास्तूचे जतन व्हावे म्हणून पुरातत्व विभागाच्या वतीने येथे कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.मंदिराचे रक्षण करणे त्यांची जबाबदारी असतांना घंटा चोरीस गेलीच कशी असा संतप्त सवाल भाविकांमधून व्यक्त होत आहे. अज्ञात चोरट्यांचा पोलिसांनी शोध लावावा अशी मागणी भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आली आहे.

# सप्ताहाच्या नियोजनासाठी श्रीरामपुरात संपर्क कार्यालय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** सद्गुरू गंगागिरी महाराज यांचा १७९ व्या अखंड हरिनाम सप्ताह राहाता तालुक्यातील धनगरवाडी येथे १८ ऑगस्ट ते २५ ऑगस्ट २०२६ या दरम्यान संपन्न होत आहे. या सप्ताहाचे नियोजन, देणगी, श्रमदान व इतर महत्त्वाच्या बाबींचे नियोजन करण्यासाठी श्रीरामपूर शहरातील मध्यवर्ती असलेल्या मेनरोडवरील लोकमान्य टिकळ वाचलनालयातील आगाशे सभागृह येथे संपर्क कार्यालय सोमवार दि. १० ऑगस्टपासून सुरू होत आहे. श्रीरामपूर शहर व तालुक्यातील महाराज मंडळीच्या शुभहस्ते सोमवार दि. १० ऑगस्ट रोजी सकाळी १० वा. मान्यवरांच्या उपस्थितीत संपर्क कार्यालयाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी सर्व नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन सद्गुरू गंगागिरी महाराज भक्त मंडळाचे वतीने करण्यात आले आहे.




# आधुनिक तंत्रज्ञानाने ऊस शेती केल्यास फळबागेप्रमाणे नफा मिळेल : डॉ. उत्तमराव कदम

**लोणी:** ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून शास्त्रशुद्ध पद्धतीने ऊस लागवड करावी. एकरी उत्पादन वाढविण्यासाठी ऊस शेतीकडे डोळसपणे पाहण्याबरोबरच कृषी शास्त्रज्ञ व तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा. तंत्रज्ञान समजून घेऊन ऊस शेती केल्यास फळबागेप्रमाणे ही शेतीही फायदेशीर ठरू शकते, असे प्रतिपादन प्रवरा कृषी शास्त्र संस्था व कृषी विज्ञान केंद्र, बाभळेश्वरचे संचालक प्रा. डॉ. उत्तमराव कदम यांनी केले.



जलसंपदा मंत्री तथा संस्थेचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, शालिनीताई विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील व संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवरा कृषी शास्त्र संस्था, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना, कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर व फार्म डीएसएस, राजुरी यांच्या संयुक्त विद्यमाने श्री. बी. टी. गोरे यांच्या शेतात ऊस पीक पाहणी व शिवार फेरी आयोजित करण्यात आली होती. यावेळी डॉ. कदम बोलत होते.ऊस उत्पादन वाढीसाठी रुंद-सरी पद्धतीने लागवड, ठिबक सिंचन, वेळेवर खत व्यवस्थापन तसेच रोग-किडींचे नियंत्रण आवश्यक आहे. ठिबकद्वारे पाणी व आवश्यकतेनुसार खतांचा पुरवठा केल्यास उत्पादन वाढण्यास मदत होते. ऊसाची संख्या मर्यादित ठेवून प्रत्येक कांड्याचे वजन वाढविण्यावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले.

ऊस पीक सल्लागार सुरेश कोळी यांनी लागवड व उत्पादन तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन केले. बी. टी. गोरे यांनी अन्नद्रव्य व्यवस्थापन, रुंद-सरी पद्धतीचे फायदे व आधुनिक शेतीतील प्रयोगांची माहिती दिली.

यावेळी दिलीप यादव, डॉ. सोमनाथ गोरे, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख, प्राचार्य अमोल खडके यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवार फेरीत प्रत्यक्ष ऊस क्षेत्राची पाहणी करून पाणी, अन्नद्रव्ये, रोग-किड नियंत्रण व उत्पादनवाढीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# देशाच्या हवाई दलामध्ये प्रणव निमसेची भरारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** सोनई जवळील श्रीरामवाडी (चिमटा वस्ती) येथील मुळा कारखान्याचे सुरक्षा विभागाचे कर्मचारी प्रसाद रामनाथ निमसे यांचे चिरंजीव प्रणव निमसे यांची भारत देशाच्या हवाई दलामध्ये नियुक्ती झाल्याने देशसेवेत भरारी घेत तिरंगा रोवला आहे. यानिमित्ताने रुजू होण्यापूर्वी सोनई व श्रीरामवाडी ग्रामस्थांच्यावतीने सोनई गावांमधून अभिमानास्व मिरवणूक काढण्यात आली.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून मिरवणुकीला उत्साहामध्ये सुरूवात करण्यात आली. या प्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम समितीचे सभापती सुनील भाऊ गडाख यांनी प्रणव यांना सन्मानित केले.



सन्मानानंतर ग्रामस्थांच्या वतीने प्रणव यांच्या वस्तीवर छोटेखानी सभा संपन्न झाली. या सभेसाठी मुळा कारखाना राष्ट्रीय साखर कामगार युनियनचे सरचिटणीस डी एम निमसे यांनी सुत्रसंचलन केले व प्रणवच्या हवाई दलाविषयी संपूर्ण माहिती सांगितली. या कार्यक्रमाला शिक्षक चंद्रकांत आढाव, शिक्षक सुभाष बेल्हेकर, ह.भ.प.गोविंद महाराज निमसे यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रणव यांच्या यशाबद्दल मुळा उद्योग समूहाचे संस्थापक यशवंतरावजी गडाख, माजी मंत्री शंकरराव गडाख,मुळा कारखान्याचे चेअरमन भाऊसाहेब मोटे, व्हाईस चेअरमन बाळासाहेब दादा पाटील, कार्यकारी संचालक शरद बेल्हेकर, सचिव रितेश टेमक, युनियनचे अध्यक्ष अशोकराव पवार, सोनई सोसायटीचे संचालक आप्पा महाराज निमसे यांनी अभिनंदन केले. प्राध्यापक सचिन आढाव यांनी आभार मानले.

# धनगरवाडीत १७९ व्या अखंड हरिनाम सप्ताहाची घोषणा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चितळी :** कामिका एकादशीच्या पवित्र मुहूर्तावर श्रीक्षेत्र पुणतांबा येथे राहाता तालुक्यातील श्रीक्षेत्र धनगरवाडी व पंचक्रोशीतील १७९ व्या अखंड हरिनाम सप्ताहाची रविवारी धार्मिक विधीनिशी अधिकृत घोषणा करण्यात आली. गोदाधाम सरला बेटाचे मठाधीपती हभप महंत रामगिरीजी महाराज यांच्या कीर्तनानंतर सप्ताहाचे शुभश्रीफळ अखंड हरिनाम सप्ताह समितीकडे विधिवत सुपूर्द करण्यात आले.

हा सप्ताह १८ ते २५ ऑगस्ट २०२६ दरम्यान धनगरवाडी व पंचक्रोशीत होणार आहे. यानिमित्त धनगरवाडी, चितळी, चितळी स्टेशन, जळगाव, चौधरी वस्ती, चांगदेवनगर मार्गे पुणतांब्यापर्यंत भव्य मोटारसायकल रॅली काढण्यात आली. पाचशेहून अधिक मोटारसायकलस्वार सहभागी झाले. 'राम कृष्ण हरी'च्या जयघोषाने व भगव्या ध्वजांनी परिसर भक्तिमय झाला.

सद्गुरू योगीराज श्री गंगागिरी महाराजांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या या सप्ताहाला १७९ वर्षांची अखंड परंपरा आहे. ७ ऑगस्ट रोजी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत सप्ताहाचे ध्वजारोहण झाले होते

# आदिवासी संस्कृतीच्या रंगात रंगले संगमनेर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** जागतिक आदिवासी दिनानिमित्त संगमनेर शहरात आदिवासी बांधवांच्या वतीने भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत आदिवासी बांधवां समवेत आमदार अमोल खताळ यांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. पारंपरिक वाद्यांचा गजर, आदिवासी नृत्य आणि जोरदार घोषणांनी संपूर्ण शहर दुमदुमून गेले होते. विविध पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या आदिवासी बांधवांमुळे शहरातील वातावरण आदिवासी संस्कृतीच्या रंगात रंगून गेले होते.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर बसस्थानक मार्गे नवीन अकोले रोड, बायपास, अकोले रोडमार्गे मिरवणूक मातोश्री लॉन्स येथे पोहोचली. तेथे मिरवणुकीची सांगता करण्यात आली.

मिरवणुकीदरम्यान आदिवासी समाजाच्या समृद्ध परंपरा, संस्कृती, कला आणि लोकजीवनाचे दर्शन घडले. पारंपरिक नृत्य आणि वाद्यांच्या तालावर तरुणाईसह महिला, ज्येष्ठ नागरिक आणि बालकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. मिरवणुकीत सहभागी होऊन आदिवासी बांधव-भगिनींसोबत जागतिक आदिवासी दिनाचा आनंद आणि अभिमान साजरा करण्यात आला.

यावेळी आदिवासी समाजाने जल, जंगल आणि जमिनीच्या रक्षणासाठी दिलेल्या योगदानाचे स्मरण करण्यात आले. तसेच देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात आदिवासी क्रांतीवीरांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेलाही उजाळा देण्यात आला. ब्रिटिश सत्तेविरोधात संघर्ष करताना अनेक आदिवासी क्रांतीवीरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांच्या शौर्य, त्याग आणि बलिदानामुळे स्वातंत्र्यलढ्याला मोठे बळ मिळाले. अशा तमाम आदिवासी क्रांतीवीरांना यावेळी विनम्र अभिवादन करण्यात आले.

# ताहाराबाद महोत्सवानिमित्त खिचडी वाटप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव :** राहुरी तालुक्यातील ताहाराबाद येथील प्रतिपंढरी महोत्सव तसेच संत कवी महिपती महाराज यांच्या महोत्सवानिमित्त परिसरात जय्यत तयारी करण्यात आली आहे. या गोपाळकालासाठी डॉ नंदकर पॅरामेडिकल इन्स्टिट्यूट यांच्या वतीने कमिका एकादशी निमित्त भाविकांसाठी मोफत उपवासाची खिचडी वाटप स्वामी समर्थ फाटा ताराबाद या ठिकाणी रस्त्याने येणाऱ्या भक्तांसाठी रस्त्याच्या कडेला गाडी उभी करून खिचडी वाटप करण्यात आली.

या महोत्सवासाठी येणाऱ्या भक्तांसाठी स्वामी समर्थ फाटाविविध गावांमधून येणाऱ्या उपासक, भाविक व गरजू नागरिकांसाठी उपवासाच्या खिचडीचे वाटप करण्यात येत आहे.याच सामाजिक उपक्रमाचा एक भाग म्हणून डॉ. नंदकर पॅरामेडिकल इन्स्टिट्यूटच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत उपवासाच्या खिचडीचे वाटप करण्यात आली आहे. संस्थेच्या कर्मचारीवर्गाने उत्स्फूर्त सहभाग घेत भाविक व गरजू नागरिकांना खिचडीचे वाटप केले आहे. धार्मिक महोत्सवाच्या निमित्ताने भाविकांची सेवा करण्याबरोबरच सामाजिक बांधिलकी जपण्याचा हा उपक्रम संस्थेच्या वतीने राबविण्यात आला. या उपक्रमाला भाविक व नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. यावेळी संस्थेचे संस्थापक जयराम नंदकर, पदाधिकारी भाऊ पारधी, लहानू वायळ तसेच कर्मचारी उपस्थित होते.




# राहुरी बस स्थानकाची साडेसाती संपणार कधी ? तात्पुरत्या सुलभ शौचालय ची दुरावस्था प्रवासी त्रस्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**उंबरे :** गेल्या दोन दशकापासून मागणी असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी बस स्थानकाचे काम अर्ध्यावर येऊन गेल्या अनेक दिवसा पासून बंद पडल्याने यावर्षीही ते काम पूर्ण होईल याची अशा मावळली असल्याने ग्रामस्थासह प्रवाशांमधुन तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून या बस स्थानकाची साडेसाती संपणार तरी कधी ? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.



अनेक वर्षापासून मागणी असलेल्या राहुरी बस स्थानकाच्या उभाणीचे सुमारे तिनं कोटी एक्कावन लाख रुपयाचे आर्थिक बजेट असलेले हे काम मे. पाटील कंट्रक्शन कंपनी सोलापूर यांनी घेतले आहे, १ मार्च २०२४ पासून पुढील दीड वर्षात काम करण्याची मुदत होती २६ ऑगस्ट २०२४ रोजी प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली , सप्टेंबर २०२५ मध्ये कामाची मुदत संपली होती

त्यावेळी बस स्थानकाचे फक्त ३० टक्के काम झाले होते, अनेक तक्रारीनंतर कामाला सुरुवात झाली आता पन्नास टक्के काम पूर्ण झाले आहे, गेल्या अनेक दिवसा पासून ठेकेदारा सह कर्मचारी येथुन परागंधा झाले आहे.

या कामामध्ये अकरा फलाट, एक कॅन्टीन, दोन दुकाने, पोलीस नियंत्रण कक्ष, हिरकणी कक्ष ,चालक वाहक कक्ष, पार्सल कार्यालय , रिझर्वेशन व पासेस कार्यालय, स्थानक प्रमुख केबिन, चौकशी कक्ष, महिला व पुरुषांसाठी सुलभ सौचालय अशा सुविधांचे नियोजन आहे. परंतु कामच बंद पडले आहे, तात्पुरत्या स्वरूपात उभा केलेले सुलभ शौचालयाचे पत्रे सडले , तुटले असल्याने तेथे मोठी दुर्गंधी निर्माण झाली आहे , येथे महिला प्रवाशांची मोठी कुचंबना होत आहे
तरी संबंधितांनी सुलभ शौचालय झालेली दुरावस्था दुरुस्त करावी तसेच बंद पडलेले काम तात्काळ सुरू करावे अशी मागणी ग्रामस्थांसह प्रवाशांमधून होत आहे.

# भर पावसाळ्यात चांद्यात भीषण पाणीटंचाई लाखो रुपये खर्चूनही जलजीवन योजना अपूर्ण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चांदा :** नेवासा तालुक्यातील चांदा गावचा पिण्याच्या पाण्याचा वनवास गेल्या दहा-पंधरा वर्षांपासून कायम आहे. यंदा मात्र भर पावसाळ्यातच गावकऱ्यांना भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. लाखो रुपये खर्चाच्या जलजीवन योजनेचे काम अद्याप अपूर्ण असल्याने पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामस्थांना वणवण भटकावे लागत आहे. त्यामुळे तालुका प्रशासनाने तातडीने दखल घेऊन गावात टँकर सुरू करावा, अशी मागणी होत आहे.

चांदा गावच्या पाणीपुरवठा योजनेसाठी मुळा उजव्या कालव्यालगत दोन विहिरी आहेत. कालव्याला आवर्तन सुरू असताना या विहिरींमध्ये पाणीसाठा उपलब्ध होतो. मात्र आवर्तन बंद झाल्यानंतर पाणीटंचाईचे संकट निर्माण होते. सध्या दोन्ही विहिरींनी तळ गाठला असून, भर पावसाळ्यातही त्यामध्ये थेंबभर पाणी शिल्लक नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. सुमारे १५ ते २० हजार लोकसंख्या असलेल्या गावासमोर त्यामुळे मोठे संकट उभे राहिले आहे.

शासनाची महत्त्वाकांक्षी जलजीवन योजना गावासाठी वरदान ठरण्याची अपेक्षा होती. मात्र पाईपलाइन, पाणी साठवण तलाव तसेच काही ठिकाणच्या पाण्याच्या टाक्यांचे काम अपूर्ण अवस्थेत आहे. त्यामुळे योजना पूर्णत्वास कधी येणार, असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

प्रशासकराजामुळे निर्णयाचा पेचग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपल्याने सध्या गावात प्रशासक आहे. मात्र संबंधित अधिकाराबाबत प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने पाणीटंचाईवर तातडीने निर्णय घेण्यास अडचणी येत असल्याचे सांगण्यात येते.

दरम्यान, पिण्याच्या पाण्यासह खरीप हंगाम वाचविण्यासाठी मुळा उजव्या कालव्याला तातडीने आवर्तन सोडावे, अशी मागणी ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी केली आहे. वीरगळ धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत असल्याने पाणी नदीत सोडण्याऐवजी कालव्यातून पिण्यासाठी व शेतीसाठी आवर्तन सोडावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.



# कांगोणी ते नेवासा दिंडीचे प्रस्थान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** श्री क्षेत्र ज्ञानेश्वर महाराज मंदिर येथे एक दिवसीय कांगोणी ते नेवासा पायी दिंडीचे प्रस्थान मोठ्या जल्लोषात करण्यात आले. सालाबाद प्रमाणे कामिनी एकादशी निमित्ताने नेवासा येथे यात्रेदरम्यान या दिंडी सोहळ्यात हभप शिवमहाराज पंडित, हभप गाडेकर महाराज,मुळाचे संचालक सोपानराव वीरकर,रामू तात्या ठोंबळ, माजी सरपंच बंडू शिंदे, ॲड. भुसारी, सोसायटीचे संचालक पोपट रौदळ, मुळा बँकेचे संचालक रामभाऊ कराळे,मुळा कारखान्याचे माजी संचालक एकनाथ रौदळ, तंटामुक्तीचे अध्यक्ष माऊली सोनवणे, ग्रामपंचायत सदस्य माऊली कोकाटे,पाटबंधारे खात्याचे कालवा निरीक्षक कोथिंबीरे, दत्तू मंडलिक, शंकर शिंदे, आप्पासाहेब कातोरे सह महिला भजनी मंडळचे स्वागत करून प्रस्थान झाले.



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

### जि. प. प्राथ. शाळा मांडवे येथे शाळा व्यवस्थापन समितीची निवड

**उक्कलगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील मांडवे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीची नूतन कार्यकारणी नुकत्याच पार पडलेल्या पालक मेळाव्यात सर्वानुमते निवडण्यात आली आहे. या निवडीमध्ये अध्यक्षपदी दिपाली रविंद्र झाडगे यांची, तर उपाध्यक्षपदी सोनाली पोपट पोकळे यांची निवड करण्यात आली असून, या दोन्ही प्रमुख पदांवर महिलांनीच बाजी मारल्याने ग्रामस्थांमधून विशेष आनंद व्यक्त होत आहे.शाळेच्या प्रगतीसाठी आणि पालकांच्या सक्रिय सहभागासाठी आयोजित केलेल्या या पालक मेळाव्यात खालीलप्रमाणे इतर सदस्यांचीही निवड करण्यात आली आहेत. सदस्यपदी सतीश भाऊसाहेब चितळकर,भारत केरू वडितके,भाऊसाहेब फकिरा शिंदे,नामदेव अर्जुन रजपूत,दत्तात्रय रंगनाथ पवार,मनिषा बाळासाहेब वडितके,ज्योती ज्ञानेश्वर दळवी,ज्योती ईश्वर शिंदे यांची निवड झाल्या आहेत.या मेळाव्यात पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

### दाढ खुर्द दुध उत्पादक संस्थेचे अध्यक्ष व उपाध्यक्षपद बिनविरोध




**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील दाढ खुर्द दूध उत्पादक संस्थेची निवडणूक बिनविरोध पार पडली या निवडणुकीत संस्थेच्या अध्यक्षपदी नारायण किसन काहर यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्षपदी त्रिंबक यमनाजी जोरी यांची निवड करण्यात आली अध्यक्षपदी व उपाध्यक्षपदी निवड प्रक्रिया रविवारी रोजी दि ९ ऑगस्ट रोजी पार पडली. या दोन्ही जागेसाठी नारायण कहार व त्रिंबक जोरी यांचे प्रत्येकी एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक अधिकारी संदीप दहातोंडे यांनी जाहीर केले .नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्ष संचालक मंडळ यांचा सत्कार याप्रसंगी ग्रामस्थ, सभासद यांच्या वतीने करण्यात आला. यावेळी संस्थेचे पदाधिकारी कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. याप्रसंगी शांताराम जोरी ,बाबासाहेब वाडगे,बाळकृष्ण जोरी,भास्कर जोरी,व संस्थेचे बिनविरोध निवडून आलेले संचालक ज्ञानेश्वर वाडगे,अशोक जोशी,भागवत जोरी,आप्पासाहेब जोशी,राजेंद्र जोरी,पाराजी साळवे आदींसह दूध उत्पादक शेतकरी, ग्रामस्थ उपस्थित होते.

### प्रशासकीय सेवेत निवड झाल्याबद्दल उद्धव राजू एडके यांचा नागरी सत्कार



**बालाजी देडगाव** : नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथील उद्धव राजू एडके यांची सेंटर रेल्वे पुणे येथे क्लर्क पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा बालाजी देडगाव ग्रामस्थांच्या वतीने भव्य असा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी माजी चेअरमन बाबासाहेब मुंगसे, माजी सरपंच दत्ता पाटील मुंगसे, ज्येष्ठ पत्रकार बन्सीभाऊ एडके, माजी सरपंच मच्छिंद्र कदम, बहिरनाथ एडके, महादेव एडके, राजू एडके, सुरेंद्र बनसोडे सर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उद्धव एडके यांनी आपण परीक्षेची कशी तयारी केली. तयारी करत असताना कोणत्या अडचणी आल्या. या अडचणींवर कशी मात केली याविषयी माहिती दिली. शेवटी ज्येष्ठ पत्रकार बन्सीभाऊ एडके यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# कामिका एकादशीनिमित्त लाखो भाविकांनी घेतले पैस खांबाचे दर्शन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : महावैष्णव संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींची कर्मभूमी आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी व अमृतानुभव या ग्रंथांच्या रचनास्थळ असलेल्या तीर्थक्षेत्र नेवासे येथे कामिका वद्य एकादशीनिमित्त रविवारी (दि. ९) मोठी यात्रा भरली. माऊलींचे मूर्तिमंत रूप मानल्या जाणाऱ्या 'पैस' खांबाच्या दर्शनासाठी दिवसभरात सुमारे आठ लाख भाविकांनी गर्दी केली. 'पुंडलिक वरदे हरी विठ्ठल', 'श्री ज्ञानदेव तुकाराम' आणि 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'च्या जयघोषाने संपूर्ण नेवासे नगरी दुमदुमून गेली.

पहाटे तीन ते चार वाजण्याच्या सुमारास संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराचे प्रमुख वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के यांच्या हस्ते वेदमंत्रांच्या




जयघोषात 'पैस' खांबाचे विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी बालयोगी महंत ऋषिनाथजी महाराज, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, विश्वस्त ज्ञानेश्वर माऊली शिंदे, मुख्य चोपदार गणेश महाराज आरगडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कामिका एकादशीला 'माऊलींची एकादशी' म्हणून विशेष महत्त्व आहे. पंढरपूरच्या वारीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांच्या वारीची पूर्णता या एकादशीला माऊलींच्या दर्शनाने होते. त्यामुळे पहाटे दोन वाजल्यापासूनच मंदिराकडे भाविकांची गर्दी सुरू झाली होती. दर्शनासाठी सुमारे एक किलोमीटरपर्यंत रांगा लागल्या होत्या. मंदिर परिसरात दर्शनबारी तसेच मुखदर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती. भाविकांच्या सेवेसाठी विविध संस्था व मंडळांच्या वतीने मोफत शाबुदाणा खिचडी, शेंगदाणे, चहा, दूध आदी खाद्यपदार्थांचे वाटप करण्यात आले.

माजी मंत्री शंकरराव गडाख मित्र मंडळ, पंचगंगा उद्योग समूह, संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठान, सुवर्णकार समाज माऊली मित्र मंडळ, नागेबाबा पतसंस्था यांसह विविध संस्थांनी सेवा दिली. यात्रेनिमित्त देवगड दत्त मंदिर संस्थानचे महंत भास्करगिरीजी महाराज, स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, माजी आमदार संभाजीराव फाटके, बाळासाहेब मुरकुटे व विश्वासराव गडाख यांनी मंदिरास भेट देऊन पैस खांबाचे दर्शन घेतले. भाविकांच्या सुरक्षिततेसाठी तहसीलदार डॉ. संजय बिरादार आणि पोलीस निरीक्षक प्रतापराव दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला.

होमगार्ड व महिला होमगार्डसह संत ज्ञानेश्वर महाराज भक्त मंडळाच्या स्वयंसेवकांनीही सेवा बजावली. जिल्हा परिषद शाळा, ज्ञानोदय हायस्कूल, नाथबाबा विद्यालय व नेवासा मार्केट कमिटी परिसरात वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली होती. नेवासा तालुक्यासह राहुरी, श्रीरामपूर, शेवगाव परिसरातून आलेल्या शेकडो दिंड्यांनी 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'चा जयघोष करत यात्रेत सहभाग घेतला. सर्व दिंड्यांतील वारकऱ्यांचे देवस्थानच्या विश्वस्त मंडळाच्या वतीने श्रीफळ व प्रसाद देऊन स्वागत करण्यात आले.

## आ. काळेंच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोपरगाव मतदारसंघाचे आमदार आशुतोष काळे यांचा वाढदिवस यावर्षी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून सामाजिक बांधिलकी जपत विविध शैक्षणिक उपक्रमांनी साध्या व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त सडे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना काळे गटाच्या कार्यकर्त्यांच्या वतीने स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना स्कूल बॅगमिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव दिसून आले.



उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षणाचे महत्त्व पटवून देत विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास करण्याबरोबरच चांगले संस्कार आणि शिस्त जोपासण्याचे आवाहन केले.याप्रसंगी बोलतांना उपस्थितांनी सांगितले की, आमदार आशुतोष काळे यांनी कोपरगाव मतदार संघातील गावांमध्ये रस्ते, पूल व इतर विकासकामांमुळे विद्यार्थ्यांचा शाळेपर्यंतचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सुलभ झाला असून ग्रामीण शिक्षणाला चालना मिळत आहे.

यावेळी सडे गावचे सरपंच सतीश बारहाते, ग्रामसेवक चंदकांत जोशी, गणेश बारहाते, संदीप बारहाते, रमेश वाकचोरे, अमोल कोताडे, विजय बारहाते, संतोष बारहाते, अतुल बारहाते, घनशाम बारहाते, तुकाराम बारहाते, जगनाथ बारहाते, पंडित गुंजाळ, सागर बारहाते व शाळेचे शिक्षक वृंद उपस्थित होते.

धीरज पानसंबळ यांच्या पाठपुरावा...

## देवनदीवरील पूल नागरिकांसाठी खुला !

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील सडे येथील देव नदीवर पुलाच्या अपूर्ण बांधकामामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. त्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात अडचण होत होती. देव नदीवरील पूल खोला झाल्यामुळे बऱ्याच दिवसांची अडचण अखेर दूर झाली आहे.



देवनदीवर पानसंबळ, धोंडे आणि तनपुरे वस्तीला जोडणारा पूल अखेर नागरिकांच्या वापरासाठी खुला करण्यात आला आहे. सदरील पुलासाठी धीरज पानसंबळ यांनी तत्कालीन दिवंगत आ. शिवाजीराव कर्डिले यांच्याकडे केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी जिल्हा नियोजन समितीकडून सुमारे १२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता.

तसेच, शासकीय निधीला हातभार म्हणून पानसंबळ, धोंडे व तनपुरे वस्तीतील नागरिकांनी केलेल्या लोकवर्गणीतून ६० हजार रुपयांची रक्कम जमा झाली होती.

देव नदीवरील या फुलासाठी नागरिकांनी स्वतःहून लोकवर्गणी गोळा करून समाजासमोर एक आदर्श निर्माण केल्याबद्दल ग्रामपंचायतीच्या वतीने पानसंबळ, धोंडे आणि तनपुरे वस्तीवरील नागरिकांचा विशेष सत्कार करण्यात आला असून त्यांच्या या उपक्रमाचे अनेकांनी स्वागत केले आहे.

## मागण्या मान्य होईपर्यंत लढा सुरूच : अशोक राऊत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

श्रीरामपूर : ईपीएस-९५ पेन्शन योजनेतील निवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शनवाढीच्या मागणीसाठी गेल्या दहा वर्षांपासून संघर्ष सुरू असून, सरकारकडून आश्वासनांपलीकडे काहीही मिळालेले नाही. त्यामुळे पेन्शनर्सच्या मागण्या मान्य होईपर्यंत लढा सुरूच राहील. यापुढे रस्ता रोको, चक्का जाम, आमरण उपोषण, ताळा ठोको यांसारख्या आंदोलनांच्या माध्यमातून संघर्ष अधिक तीव्र केला जाईल, असा इशारा राष्ट्रीय संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष कॅप्टन अशोक राऊत यांनी दिला. नवी दिल्ली येथील जंतरमंतर मैदानावर ईपीएस-९५ योजनेतील सार्वजनिक, सहकारी व खासगी क्षेत्रातील निवृत्त कर्मचाऱ्यांच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले. प्रतिमहा किमान ७ हजार ५०० रुपये पेन्शन तसेच महागाई भत्ता मिळावा, ही प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली. साखर कारखाने, सूतगिरण्या, बँका, दूध संघ, एसटी महामंडळ, एमएसईबी, एमआयडीसी यांसह विविध संस्थांमधील निवृत्त कर्मचारी आंदोलनात सहभागी झाले. कॅप्टन राऊत म्हणाले, निवृत्त कर्मचाऱ्यांचा संयम आता संपला आहे. आम्हाला सरकारची मेहरबानी नको, तर हक्काचे निवृत्तीवेतन हवे आहे. मागणी मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याबरोबरच वेळप्रसंगी वेगळी राजकीय भूमिका घेण्याची वेळ येऊ शकते. दरम्यान, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के, श्रीरंग बारणे आणि भाऊसाहेब वाकचौरे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन पेन्शनर्सच्या मागण्यांना पाठिंबा दिला. खासदार वाकचौरे यांनी संसदेत तसेच मंत्रीस्तरावर प्रश्नाचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. मागणी मान्य होईपर्यंत सक्रियपणे प्रयत्न सुरू ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## वृक्षारोपणासोबत संगोपनही गरजेचे : डॉ. अनिल लोखंडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : वृक्षारोपण करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच लावलेल्या वृक्षांचे संगोपन व संवर्धन करणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी लोकसहभागातून वृक्षसंवर्धनाची चळवळ उभी राहणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे राज्य उपाध्यक्ष तथा माजी मुख्याध्यापक ह.भ.प. डॉ. अनिल लोखंडे यांनी केले. टाकळीभान येथील जिल्हा परिषद वस्ती शाळा, दाभाडे वस्ती येथे निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ आणि भारतीय आयुर्विमा महामंडळ (एलआयसी) यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रम झाला. यावेळी डॉ. लोखंडे बोलत होते.



प्रत्येकाने वाढदिवसानिमित्त एक वृक्ष लावून त्याचे संगोपन केल्यास मोठ्या प्रमाणात जनसहभागातून पर्यावरण संवर्धनाची चळवळ उभी राहू शकते, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासूनच पर्यावरणाबाबत जागरूक राहून लावलेल्या वृक्षांची काळजी घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी एलआयसी शाखाधिकारी नामदेव कानडे, सरपंचपती यशवंत रणनवरे, आबासाहेब रणनवरे, राजेंद्र कोकणे, अर्जुन राऊत, विठ्ठल दाभाडे यांच्यासह ग्रामस्थ, शिक्षक व पदाधिकारी उपस्थित होते.

आबासाहेब रणनवरे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन अर्जुन राऊत व विठ्ठल दाभाडे यांनी केले.

काकोडकर समितीचा अहवाल प्रतिकूल आल्यास

## सर्वप्रथम मीच रस्त्यावर उतरेन : आ. अमोल खताळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्पाच्या मागणीसाठी प्रस्तावित चक्काजाम आंदोलन सर्वपक्षीय असल्याचा दावा केला जात असला, तरी या आंदोलनाबाबत आपल्याला कोणाचाही फोन अथवा निरोप आलेला नाही. त्यामुळे हे आंदोलन सर्वपक्षीय नसून एका कुटुंबापुरते आणि राजकीय कुरघोडीपुरते मर्यादित असल्याची टीका आमदार अमोल खताळ यांनी केली.



पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे झाली पाहिजे, ही आपली भूमिका सुरुवातीपासूनच स्पष्ट आहे. हा प्रकल्प संगमनेरसह संपूर्ण परिसराच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तज्ज्ञ समिती स्थापन करण्याचा शब्द दिल्यानंतर ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यामुळे समितीचा अहवाल येण्यापूर्वीच आंदोलन करून जनतेला वेठीस धरण्यापेक्षा अहवालातील निष्कर्ष समोर येणे महत्त्वाचे असल्याचे खताळ म्हणाले. काकोडकर समितीचा अहवाल सकारात्मक आला तर त्याचे स्वागत करू. मात्र, अहवाल प्रतिकूल आला आणि संगमनेरच्या हक्काच्या मार्गाला नकार दिला गेला, तर तालुक्याचा लोकप्रतिनिधी म्हणून सर्वप्रथम मीच रस्त्यावर उतरेन. जनतेच्या हक्कासाठी वेळप्रसंगी उपोषण करण्याची वेळ आली तरी मागे हटणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. लोकशाहीत आंदोलनाचा अधिकार प्रत्येकाला आहे; मात्र आंदोलन जनतेच्या प्रश्नासाठी असावे, राजकीय श्रेयासाठी नव्हे. पुणे-नाशिक रेल्वे हा कोणत्याही व्यक्तीचा किंवा कुटुंबाचा विषय नसून संगमनेर, अहिल्यानगर, पुणे आणि नाशिकच्या भवितव्याशी जोडलेला विकासाचा प्रश्न आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या समवेत दिल्लीत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन प्रकल्पासाठी पाठपुरावा केल्याचे खताळ यांनी सांगितले. रेल्वेमंत्र्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही प्रकल्पासाठी आग्रह धरल्याचे सांगितल्याचे त्यांनी नमूद केले. या रेल्वेमुळे संगमनेरला पुणे व नाशिकशी जलद जोडणी मिळून उद्योग, व्यापार, शिक्षण, रोजगार आणि कृषी क्षेत्राला मोठी चालना मिळेल. त्यामुळे प्रकल्पाबाबत कोणतीही तडजोड करणार नसल्याचा निर्धार खताळ यांनी व्यक्त केला.

## प्रवरा अभियांत्रिकीच्या शंभर टक्के विद्यार्थ्यांना प्लेसमेंट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालयातील सिव्हिल अभियांत्रिकी विभागाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये १०० टक्के प्लेसमेंट मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

विभागातील विद्यार्थ्यांची के. रहेजा कॉर्पोरेशन, सोपान ओ अँड एम, सुरोज बिल्डकॉन, सेपाडू टेक, स्क्वेअर यार्ड, लक्ष्मी सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस, प्रोबीओन टेक, ड्रिव्हन स्टील आणि आकार्थ फॉर्मवर्क सोल्युशन आदी नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली.

मोहित उनवणे याची सोपान ओ. अँड एम, पुणे येथे वार्षिक चार लाख रुपयांच्या पॅकेजवर निवड झाली. आदित्य काळे याची सुरोज बिल्डकॉन, तर पूजा मोहिते हिची के. रहेजा कॉर्पोरेशन येथे निवड झाली.

प्राचार्य डॉ. संजय गुल्हाणे यांनी हे यश गुणवत्तापूर्ण शिक्षण, उद्योगाभिमुख प्रशिक्षण व कौशल्यविकासाचे फलित असल्याचे सांगितले. विभागप्रमुख डॉ. प्रमोद कोळसे, प्लेसमेंट समन्वयक प्रा. लक्ष्मण लहामगे, प्लेसमेंट अधिकारी डॉ. आण्णासाहेब वराडे यांचे मार्गदर्शन लाभले.

संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## आदिवासींच्या हक्कांसाठी एकजुटीने लढा उभारा : शिवाजीराव ढवळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : आदिवासी हा या देशाचा मूळ मालक असून, त्याला 'वनवासी' संबोधून त्याच्या हक्कांपासून वंचित करण्याचे षडयंत्र रचले जात आहे. स्वातंत्र्याच्या इतक्या वर्षांनंतरही आदिवासी समाज मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. त्यामुळे आपल्या हक्कांसाठी आणि भावी पिढीच्या भवितव्यासाठी आदिवासी समाजाने एकजुटीने लढा उभारण्याची वेळ आली आहे, असे प्रतिपादन एकलव्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा म्हाडा नाशिक विभागाचे माजी अध्यक्ष शिवाजीराव ढवळे यांनी केले.

संगमनेर तालुक्यातील आश्वी बुद्रुक येथील साई मंगल कार्यालयात एकलव्य संघटना महाराष्ट्र राज्याच्या वतीने आयोजित 'आदिवासी अधिकार अभियान व युवा जनजागृती मेळाव्या'त ते बोलत होते.

ढवळे म्हणाले की, आदिवासी समाजासाठी शासनाच्या अनेक योजना कागदावर आहेत; मात्र त्यांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचतो का, हा प्रश्न आहे.

आदिवासींच्या जमिनींवर अतिक्रमणे होत असून, 'वनवासी' संबोधणे हे त्यांच्या ओळखीपासून व हक्काच्या जमिनीपासून दूर करण्याचे कारस्थान आहे. तरुणांनी इतरांच्या दावणीला बांधले जाण्यापेक्षा संघटित होऊन आपल्या हक्कांसाठी संघर्ष करावा, असे आवाहन त्यांनी केले.

तालुकाध्यक्ष अनिल बर्डे यांनी एकलव्य संघटना तळागाळापर्यंत पोहोचवून आदिवासी समाजासाठी काम सुरू असून, 'गाव तेथे एकलव्य संघटना' उभी करणार असल्याचे सांगितले. मेळाव्यास लक्ष्मणराव वडले, शिवाजीराव भालेराव, सुधीर बिंदे, किरण ठाकरे, प्रा. वैभव सोनवणे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाला दोन तास उशीर होऊनही महिला, तरुण व आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. यावेळी संघटनेच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या नवनियुक्त्याही करण्यात आल्या.

## श्रीरामपुरात कामगार साहित्य वाटप कार्यक्रम उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरातील प्रभाग क्र. १४, वॉर्ड नं.४ मधील नॉर्दर्न ब्रँच परिसरात नगरसेविका आशाताई संतोष परदेशी व संतोष परदेशी यांच्यावतीने कामगार साहित्य वाटप कार्यक्रमाचे नुकताचा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास आमदार हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे, नगरसेवक योगेश जाधव, नगरसेवक दिलीप नागरे यांच्यासह परिसरातील अनेक आजी-माजी नगरसेवक, आदी मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमा दरम्यान, नगरसेविका परदेशी यांनी युवा स्वाभिमान पक्षाचे जिल्हाध्यक्ष विवेक माटा यांचा नागरी सत्कार केला.यावेळी बोगस कामगारांचा आणि शासकीय योजनांमधील गैरप्रकारांचा अत्यंत धडाडीने पर्दाफाश केल्याबद्दल उपस्थितांच्या वतीने माटा यांच्या उल्लेखनीय कार्याचा जाहीर गौरव करण्यात आला. या महत्त्वपूर्ण कार्यक्रमास परिसरातील कामगार बांधव आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> शासकीय योजनांसाठी वापरला जाणारा पैसा हा सर्वसामान्य जनतेने भरलेल्या कराचा (टॅक्सचा) पैसा असतो. त्यामुळे या योजनांचा थेट आणि खरा लाभ केवळ पात्र कामगारांपर्यंतच पोहोचला पाहिजे. बोगस लोकांमुळे खऱ्या कष्टकऱ्यांचे हक्क मारले जातात. कामगारांनी कोणत्याही फसवणुकीला बळी पडू नये आणि आपल्या हक्कांप्रती नेहमी जागृत राहावे.
>
> **विवेक माटा**
> **स्वाभिमान पक्षाचे जिल्हाध्यक्ष**

# पान १ वरुन

## नाशिक-पुणे सरळ रेल्वेसाठी हजारोंचा एल्गार

तीन तास चक्काजाम असे असताना काम थांबण्याचे कारण काय, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. थोरात म्हणाले, नाशिक-पुणे सरळ रेल्वे मार्ग हा शेतकरी, व्यापारी, उद्योजक, विद्यार्थी आणि तरुणांच्या भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. गोल्डन ट्रँगलसाठी महत्त्वाच्या या मार्गामुळे परिसराची देशाशी कनेक्टिव्हिटी वाढणार आहे. डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असली तरी पुन्हा शून्यापासून प्रक्रिया सुरू झाल्यास आतापर्यंत झालेले काम वाया जाण्याची भीती आहे. त्यामुळे या प्रश्नावर राजकारण न करता सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले. पद्मश्री रघुवीर खेडकर यांनीही सरळ रेल्वे मार्गासाठी जनतेने एकजुटीने लढा देण्याचे आवाहन केले. हा संगमनेरच्या विकासाचा प्रश्न असून, सर्व जाती-धर्मातील नागरिक एकत्र आले आहेत, असे त्यांनी सांगितले. माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी नाशिक-पुणे सरळ रेल्वे मार्ग नैसर्गिक असून, संगमनेरचा विकास रोखण्यासाठी मार्गात बदल करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला. केंद्र सरकारने जनतेचा आवाज ऐकून तातडीने सरळ मार्गाने रेल्वे सुरू करावी, अशी मागणी त्यांनी केली. आंदोलनादरम्यान 'रेल्वे आमच्या हक्काची', 'नाशिक-पुणे सरळ रेल्वे झालीच पाहिजे' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. युवकांसह नागरिकांचा मोठा सहभाग आंदोलनाचे वैशिष्ट्य ठरले. यावेळी प्रा.हिरालाल पगडाल, रामहरी कातोरे, छात्र भारतीचे अनिकेत घुले, डॉ.कोल्हे, अमर कतारी, विश्वासराव मुर्तडक, सिताराम राऊत, उत्कर्षाताई रूपवते, अजय फटांगरे, सोमेश्वर दिवटे यांनीही सरकारच्या धोरणांवर टीका केली. या आंदोलनासाठी हजारो नागरिक नाशिक - पुणे रेल्वे मार्गाच्या गांधी टोप्या घालून आंदोलनामध्ये हजर होते. प्रांताधिकारी व उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी निवेदन स्वीकारले.

## दारूच्या पैशांसाठी आईचा खून

मात्र, दरम्यानच्या काळात बेबी मालुसरे यांच्या मृत्यूची माहिती स्थानिकांना मिळाली. घटनेची माहिती मिळताच स्थानिकांनी भोर पोलिसांशी संपर्क साधला. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत घराची पाहणी केली. प्राथमिक तपासानंतर समीर मालुसरे याला ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणाचा पुढील तपास भोर पोलिसांकडून सुरू आहे. दारूच्या व्यसनातून घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात संताप व्यक्त केला जात आहे.

## विमानतळावर नोकरीसाठी बोगस परीक्षा..?

५०० ते ७०० रुपयांची फी उकळण्यात आली. महिन्याला २५ हजार रुपयांचा पगार आणि विमानतळावरील झगमगीत नोकरीच्या आमिषाला बळी पडत राज्यभरातील शेकडो विद्यार्थी आज छत्रपती संभाज नगरच्या उस्मानपुरा येथील एका शाळेत पोहोचले, पण आपली फसवणूक झाल्याचा दावा आता या विद्यार्थ्यांनी केला आहे. विशेष म्हणजे महिन्याभरापासून ऑनलाईन अर्ज भरून, अभ्यासाची तयारी करून परीक्षेसाठी आलेल्या विद्यार्थ्यांना खरी परिस्थिती लक्षात येताच त्यांच्या पायाखालची वाळूच सरकली. तसेच कंपनीने सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन संगणकीय परीक्षा होणार असल्याचे ठोकून सांगितले होते. मात्र, प्रत्यक्ष केंद्रावर एकही संगणक उपलब्ध नव्हता. अधिक विचारणा केली असता, परीक्षा घेण्यासाठी आलेली कथित 'थर्ड पार्टी' कंपनीही हात वर करत आम्हाला काहीच माहिती नाही, असं सांगत असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. याबाबत माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस देखील दाखल झाले. विद्यार्थ्यांनी संताप व्यक्त केला. दरम्यान, देशात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी असून युवकांच्या हाताला काम नाही, म्हणावी तशी नोकरी नाही, असे सांगत अभिजीत दीपके जेन झी तरुणाईचा संताप सर्वत्र दिसत असल्याचे सांगतात. संभाजीनगरमधील घटनाही त्याचीच पुनरावृत्ती असल्याचं दिसून येत आहे.

## ५० हजार ८०६ शेतकऱ्यांना मरणोत्तर कर्जमाफी

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचा प्रोत्साहन निधी देण्यात येणार आहे. तसेच दोन लाखांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनी अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर एकवेळ समझोता योजनेत सरकारकडून दोन लाख रुपये देण्यात येणार आहेत. मरणोत्तर कर्जमाफीचा सर्वाधिक लाभ मराठवाड्यातील १८ हजार ७२३ शेतकऱ्यांना मिळाला. त्यापाठोपाठ अमरावती विभागातील ११ हजार ९४६, नाशिक विभागातील ७ हजार ६३९, पुणे विभागातील ६ हजार ३२२, नागपूर विभागातील ४ हजार ६०९ आणि कोकणातील १ हजार ५६७ शेतकऱ्यांचा समावेश आहे. दरम्यान, ५० हजारांहून अधिक शेतकऱ्यांना मरणोत्तर कर्जमाफी मिळणे ही गंभीर बाब आहे. कर्जबाजारीपणामुळे किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केली, याचा सविस्तर तपशील सरकारने जाहीर करावा, अशी मागणी शेतकरी नेते अजित नवले यांनी केली आहे. या आकडेवारीतून शेतकरी आत्महत्यांमागील कर्जबाजारीपणाचे वास्तव अधिक स्पष्ट होईल, असे त्यांनी म्हटले आहे.

## जखमी मनपा कर्मचाऱ्याचा अखेर मृत्यू

दरम्यान, बंदच्या घोषणेदरम्यान हिंदुत्ववादी कार्यकर्ते आणि पोलिसांमध्ये बाचाबाची झाल्याचीही माहिती आहे. त्यामुळे मुकुंदनगरसह शहरातील संवेदनशील भागात पोलिसांचा बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. दरम्यान मनपा कर्मचारी धीरज परदेशी यांच मृत्यूची बातमी समजताच हिंदुत्ववादी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी शहरात बाजारपेठेत जाऊन दुकाने बंद करण्याचे आवाहन केले. यावेळी व्यापाऱ्यांनी आपापली दुकाने बंद करून या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तसेच नगर मनमाड महामार्ग, नगर पुणे महामार्ग, नगर छत्रपती संभाजी महामार्ग, नगर सोलापूर महामार्ग या ठिकाणीही व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद करून बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दरम्यान दुपारी हिंदुत्ववादी संघटनेचे कार्यकर्ते हातमपुरा व कुठला स्टॅन्ड या परिसरात बंदचे आवाहन करत असताना त्यांना मुस्लिम जमावाने विरोध केला. आम्ही दुकाने बंद करणार नाही. यामुळे परिसरात दोन्ही गट आमने-सामने आले. यावेळी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केला. पोलिसांनी यावेळी हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांना घटनास्थळावरून दूर केले. या घटनेने हिंदुत्ववादी संघटनेच्या कार्यकर्त्यांमध्ये रोष निर्माण झाला. पोलीस प्रशासनाच्या या दुप्पटी भूमिकेचा कार्यकर्त्यांनी निषेध केला. बंदची आवाहन करत असताना पोलिसांनी आमच्यावरच कारवाई केली. मात्र विरोधकांना मोकळे रान दिले असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. या दुर्दैवी घटने वेळी बंदला विरोध करणाऱ्यांवरही कारवाई करण्यात यावी अशी मागणी हिंदुत्ववादी संघटनांनी प्रशासनासमोर लावून धरली. या घटनेमुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अखेरीस पोलीस प्रशासनाने हातमपुरा ,कुठला स्टॅन्ड, सर्जेपुरा, पंचपीर चावडी, मुकुंद नगर ,आलमगीर तसेच इतर संवेदनशील भागात मोठा बंदोबस्त तैनात केला आहे. दिवसभरात कुठेही अनुचित घटना घडल्याची नोंद झालेली नाही. आ. जगताप व आ. कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेले रास्ता रोको आंदोलन रात्री उशिरापर्यंत सुरू होते. या आंदोलनात हजारोंच्या संख्येने हिंदुत्ववादी कार्यकर्ते सहभागी झाले होते. आंदोलनकर्त्यांनी या गुन्ह्यातील आरोपींची घरे तात्काळ जमीन दोस्त करण्यात यावीत. जिल्हा पोलिस प्रमुख सुदर्शन, शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक वैभव कुलबर्ग तसेच इतर वरिष्ठ अधिकारी तोफखाना ,कोतवाली, भिंगार कॅम्प ,नगर तालुका व एमआयडीसी पोलीस ठाण्यांचे अधिकारी हे परिस्थितीवर नियंत्रण ठेवून आहेत. दरम्यान या घटनेमुळे शहरात सर्वत्र संतापाची लाट उसळली असून पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला आहे.

## न्यायाधीशांच्या कारला कंटेनरची धडक

### अतिक्रमणाचा प्रश्न ऐरणीवर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** शहरातील मुख्य चौकात वाढलेले अतिक्रमण, बेशिस्त पार्किंग आणि वाहनांची वाढती वर्दळ यामुळे वाहतुकीची कोंडी होत असतानाच शुक्रवारी मध्यरात्री जिल्हा सत्र न्यायालयातील एका न्यायाधीशांच्या कारला कंटेनरने धडक दिली. या अपघातात न्यायाधीश आणि त्यांची लहान मुलगी सुदैवाने बचावले. मिळालेल्या माहितीनुसार, न्यायाधीश मुलीसह कारने येवला रोडच्या दिशेने जात होते. त्याचवेळी येवला दिशेने जाणाऱ्या कंटेनरची कारला धडक झाली. कंटेनरने कारच्या चालकाच्या बाजूकडील मागील भागाला काही अंतर घासत नेल्याने कारचे मोठे नुकसान झाले असून मागील चाकही खराब झाले.घटनेची माहिती मिळताच पोलिसांची दोन वाहने घटनास्थळी दाखल झाली. पोलिसांनी न्यायाधीश व त्यांच्या मुलीला सुरक्षितपणे घरी पोहोचविले. अपघातामुळे घाबरलेल्या मुलीला पोलिसांनी शांत केले. या घटनेच्या निमित्ताने शहरातील अतिक्रमण आणि वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. मुख्य चौक व येवला रोडलगत हातगाड्या, वाढीव दुकानांचे भाग आणि अनधिकृत पार्किंगमुळे रस्ते अरुंद झाले आहेत. मोठ्या कंटेनरना मार्ग काढताना अडचणी येत असून दुचाकीस्वार व पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रशासनाने अतिक्रमणे हटवून अनधिकृत पार्किंगवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## अहिल्यानगर-मनमाड रस्त्याची दुरावस्था

### विधानमंडळ अंदाज समितीचा सरकारकडे चौकशीचा प्रस्ताव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** वर्षानुवर्षे रखडलेल्या अहिल्यानगर-मनमाड राष्ट्रीय महामार्गाच्या दुरावस्थेवरून विधानमंडळाच्या अंदाज समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या रस्त्यासह महापालिकेच्या विविध विकासकामांमधील दिरंगाई आणि अनियमिततेची थेट सरकारमार्फत चौकशी करण्याची शिफारस करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय समितीने घेतला आहे. आ. अर्जुन खोतकर यांच्या अध्यक्षतेखालील विधानमंडळ अंदाज समितीचा तीन दिवसीय जिल्हा दौरा नुकताच अहिल्यानगर येथे संपन्न झाला. या दौऱ्यादरम्यान समितीने जिल्ह्यातील आणि महापालिका हद्दीतील महत्त्वाच्या प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेतला.महापालिका प्रकल्पांवर प्रश्नांची सरबत्तीउ समितीने प्रामुख्याने सीना नदी खोलीकरण-रुंदीकरण, भिंगार नाला खोलीकरण, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प आणि अमृत पाणी पुरवठा



योजना या चार मोठ्या प्रकल्पांची पाहणी आणि आढावा बैठक घेतली. यावेळी सीना नदीच्या गाळ उपशासाठी खर्च करण्यात आलेले २० कोटी रुपये आणि भिंगार नाल्यासाठी खर्च झालेले १३ कोटी रुपये यावर समितीने गंभीर प्रश्न उपस्थित केले. एवढा मोठा निधी खर्च होऊनही प्रत्यक्ष काम अपूर्ण आणि संशयास्पद असल्याचे निरीक्षण समितीने नोंदवले. याबाबत महापालिका आयुक्त डांगे यांच्यावर सदस्यांनी विविध प्रश्नांची सरबत्ती केली. छकअख च्या कारभारावर ताशेरे सर्वात जास्त चर्चा झाली ती अहिल्यानगर-मनमाड रस्त्याच्या कामावरून. या रस्त्याचे काम गेल्या अनेक वर्षांपासून संथगतीने सुरू असून, ठिकठिकाणी खड्डे आणि अपूर्ण कामामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर समितीने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (छकअख) कारभारावर कडक ताशेरे ओढले.गैरहजर अधिकाऱ्यांना नोटीस दरम्यान, आढावा बैठकीला अनेक वरिष्ठ अधिकारी गैरहजर राहिल्याने समितीने नाराजी व्यक्त केली. विशेषतः भूजल सर्वेक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीची गंभीर दखल घेत त्यांना तात्काळ नोटिसा बजावण्याचे आदेश अध्यक्ष अर्जुन खोतकर यांनी दिले. एकूणच, सीना नदी, भिंगार नाला आणि नगर-मनमाड रस्त्यासह सर्वच प्रकल्पांमध्ये झालेला निधीचा अपव्यय आणि कामातील दिरंगाई लक्षात घेता, या सर्व प्रकरणांची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यासाठी सरकारकडे शिफारस करण्यात येणार असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे.

## माणुसकीला काळिमा! आजारी गायीला झाडाला बांधून निर्जनस्थळी सोडले; अखेर तडफडत मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** ज्या गायीने आयुष्यभर माणसाला दूध देऊन जगविले, त्याच गायीला आजारी झाल्यानंतर माणसानेच मरणाच्या दारात नेऊन सोडल्याची हृदयद्रावक घटना संगमनेर-लोणी मार्गावरील कोंची घाटात घडली आहे. आजारी गायीचे पाय दोरीने झाडाला बांधून, तिला वाहनातून खाली लोटून निर्जनस्थळी सोडून देण्यात आले. उपचार तर दूरच; साधे पाणीही न मिळाल्याने या मुक्या जीवाचा अखेर तडफडत मृत्यू झाला.

संगमनेर-लोणी रस्त्यावरील कोंची घाटातील निर्जन ठिकाणी



रस्त्याच्या कडेला ही गाय आढळून आली. अज्ञात वाहनचालकाने आजारी अवस्थेतील गायीला वाहनातून खाली उतरवून तिचे पाय दोरीच्या साह्याने झाडाला बांधले आणि तेथून निघून गेल्याचे दिसून आले. मंगळवारी सकाळपर्यंत ही गाय अत्यवस्थ अवस्थेत जीवनाशी झुंज देत होती. उठण्याचा प्रयत्न करूनही झाडाला बांधलेल्या अवस्थेत ती असह्यपणे तडफडत होती. मात्र, मदत किंवा उपचार न मिळाल्याने अखेर तिचा मृत्यू झाला.

या मुक्या जीवाचा मृत्यू झाल्यानंतरही त्याची परवड थांबलेली नाही. मृत गायीचा मृतदेह घटनास्थळीच पडून असून मोकाट कुत्रे त्याचे लचके तोडत असल्याचे विदारक चित्र दिसत आहे. रस्त्याने ये-जा करणाऱ्या नागरिकांचे काळीज हेलावून टाकणारे हे दृश्य असून, या घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त होत आहे.

पशुसंवर्धन विभाग, ग्रामपंचायत आणि संबंधित प्रशासनाने या घटनेची तातडीने दखल घेऊन मृत गायीची सन्मानपूर्वक विल्हेवाट लावावी. तसेच आजारी जनावराला अमानुषपणे बांधून निर्जनस्थळी सोडून देणाऱ्या संबंधित व्यक्तीचा शोध घेऊन पशुक्रूरता प्रतिबंधक कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## रस्ते, वीज, पाणी प्रश्नांवर आ. लंघे यांनी उठवला विधानसभेत आवाज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** नेवासा विधानसभा मतदारसंघाचे आ.विठ्ठलराव लंघे पाटील यांनी आपल्या पहिल्याच आमदारकीच्या कालावधीत उत्कृष्ट कामगिरीचा नमुना पेश करत नेवासा तालुक्याच्या अनेक प्रलंबित प्रश्नांवर मुद्देसूद टिप्पणी करत थेट विधानसभेत आवाज उठवला आहे.यामध्ये तालुक्यातील रस्ते,वीज,पाणी आणि धरणग्रस्त गावांच्या पुनर्वसित नागरिकांना या मूलभूत सोयीसुविधा मिळण्यासाठी त्यांनी सरकारचे लक्ष वेधले आहे.

आमदार लंघे पाटील यांनी आपल्या पहिल्याच आमदारकीच्या टर्ममध्ये ही नेत्रदीपक अभ्यासू कामगिरी केल्यामुळे तालुक्याच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न आता प्रत्यक्षात साकारणार आहे. आ. लंघे पाटील यांची आमदारकी त्यामुळे खऱ्या अर्थाने सार्थकी लागल्याची भावनाही महायुतीच्या प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांतून व्यक्त केली जात आहे

त्यांच्या या कामगिरीवर तालुक्यातून मोठे समाधान व्यक्त केले जात आहे. आ. लंघे पाटील यांनी नेवासे तालुक्याच्या प्रमुख प्रश्नांची आणि समस्यांची सोडवणूक करण्यासाठी शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री विखे यांच्यासमोर आपल्या मतदारसंघाच्या समस्या मांडून त्या प्रश्नांची सोडवणूक आ. लंघे हे मोठ्या खुबीने करत असल्यामुळे आता त्यांच्या सर्वच राजकीय विरोधकांनी त्यांच्या कामगिरीचा मोठा धसका घेतला आहे

सर्वच विरोधक हे आ. लंघे यांचे राजकारणविरहित जवळचे पक्के दोस्त असल्यामुळेच त्यांच्यावर सुद्धा विरोधकांकडून कधीही टीका केली जात नाही. ही राजकीय किमया केवळ राजकारणात आ. लंघे यांनीच नगर जिल्ह्यात साध्य करुन दाखविली. शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पाठबळावर त्यांनी नेवासे तालुक्यातील अनेक प्रश्न मार्गी लावत बहुतांशी कामे देखील मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत.

## बारामतीत 'दृश्यम'ची पुनरावृत्ती! पतीला गुंगीचे औषध देऊन जिवंत पुरण्याचा प्रयत्न

**बारामती :** प्रसिद्ध 'दृश्यम' चित्रपटात मृतदेह लपवण्यासाठी पोलिसांच्या नकळत बांधकाम केल्याचे दाखवण्यात आले होते. त्याच धर्तीवर अंगावर काटा आणणारा प्रकार बारामती शहरात समोर आला आहे. ३८ वर्षीय महिलेने आपल्या पतीला गुंगीचे औषध देऊन अर्धवट बेशुद्ध केल्यानंतर बॅटने मारहाण केली आणि त्याला घरातच जिवंत पुरण्याचा प्राणघातक प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सुदैवाने हा प्रकार वेळेत उघडकीस आल्याने पतीचा जीव वाचला.

ही घटना बारामती शहरातील जामदार रोडवरील इंद्रप्रस्थ सोसायटीमधील फ्लॅट क्रमांक ९ येथे ३० जुलै २०२६ रोजी रात्री साडेअकरापासून १ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी साडेअकरा वाजेपर्यंतच्या कालावधीत घडल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी शर्मिला प्रवीण जगताप (वय ३८) हिने पती प्रवीण प्रकाश जगताप यांना ठार मारण्याच्या उद्देशाने गुंगीचे औषध दिल्याचा आरोप आहे. औषधाच्या प्रभावामुळे प्रवीण अर्धवट बेशुद्ध झाल्यानंतर शर्मिलाने त्यांना बॅटने मारहाण केली. त्यानंतर त्यांना घरातच कायमचे संपवून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने हॉलच्या गॅलरीत विटा आणि सिमेंटचा चौकोनी कट्टा बांधण्यात आला.

बेशुद्ध अवस्थेतील प्रवीण यांना या कट्ट्यात झोपवून त्यावर कडप्पा फरशी लावून तो पूर्णपणे बंद करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप आहे. मात्र हा सर्व प्रकार समोरच राहणाऱ्या एका शेजाऱ्यांनी पाहिला आणि याची माहिती पोलिसांना देण्यात आली. त्यामुळे हा प्रकार उघडकीस आला आणि प्रवीणचे प्राण वाचले. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, चित्रपटातील कथानकाशी साधर्म्य असलेल्या या प्रकाराची नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे.

दरम्यान, प्रवीण जगताप यांचे वडील प्रकाश जगताप यांनी बारामती शहर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून आरोपी पत्नी शर्मिला जगताप हिच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास बारामती शहर पोलीस करीत असून, घटनेमागील नेमके कारण आणि इतर बाबींचा तपास केला जात आहे.

## द्रोणा अकॅडमी तर्फे भव्य ॲथलेटिक्स स्पर्धेचे आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** राहाता तालुक्यातील साकुरी येथील अशोक दामोधर दंडवते पाटील ग्रामीण शैक्षणिक प्रतिष्ठान संचलित द्रोणा अकॅडमीच्या वतीने आंतरशालेय ॲथलेटिक्स स्पर्धेचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते.



या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ प्रमुख पाहुणे कपिल आणि द्रोणा अकॅडमीचे अध्यक्ष जयराज दंडवते यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे कपिल यांचा साईबाबांची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.

नांदुर्खी येथील द्रोणा अकॅडमीच्या संकुलात आयोजित या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील विविध शाळांमधील शेकडो विद्यार्थी-खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अकॅडमीतील विद्यार्थ्यांचाही या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग होता.

स्पर्धेमध्ये धावणे, लांब उडी, उंच उडी, गोळाफेक, रिले शर्यत यांसह विविध मैदानी क्रीडा प्रकार घेण्यात आले. केवळ विजय नव्हे तर विद्यार्थ्यांमधील क्रीडा गुण, शिस्त, संघभावना आणि खेळाडू वृत्ती यांना या स्पर्धेत विशेष महत्त्व देण्यात आले.

यावेळी द्रोणा अकॅडमीच्या प्राचार्या अनिता रोहोम यांनी सर्व स्पर्धक विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व आपले मनोगत व्यक्त केले.

या प्रसंगी अकॅडमीच्या संचालिका प्राजक्ताताई दंडवते, उपाध्यक्ष अनुप दंडवते, प्राचार्या अनिता रोहोम, क्रीडा शिक्षक रवींद्र मोगल यांच्यासह सर्व शिक्षक-शिक्षिका, विविध शाळांतील विद्यार्थी व त्यांचे क्रीडा शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ६३ कोटींच्या ऑनलाइन फसवणुकीचा छडा

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर खुर्द येथील भूमिपुत्र तथा मुंबई शहर पोलीस दलातील डी.बी. मार्ग पोलीस ठाण्यात कार्यरत सहायक पोलीस निरीक्षक (अझख) अभिजीत अजितराव देशमुख यांनी ऑनलाइन फसवणुकीच्या तब्बल ६३ कोटी रुपयांच्या गुन्ह्याचा यशस्वी तपास करून आरोपींचा छडा लावला. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मुंबई शहराचे पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्या हस्ते त्यांना प्रशंसापत्र देऊन गौरविण्यात आले. डी.बी. मार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १००३/२०२६ अन्वये ऑनलाइन फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करताना अझख अभिजीत देशमुख यांनी तांत्रिक माहिती, उपलब्ध पुरावे आणि तपासाच्या विविध पैलूंचा बारकाईने अभ्यास करून फसवणुकीच्या रकमेचा तसेच गुन्ह्यात सहभागी असलेल्या आरोपींचा माग काढला. शिताफीने तपास करत त्यांनी आरोपींना अटक करून गुन्हा उघडकीस आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. ऑनलाइन आर्थिक फसवणुकीचे वाढते प्रकार पाहता, तब्बल ६३ कोटी रुपयांच्या रकमेचा समावेश असलेल्या या गुन्ह्याचा तपास करून आरोपींना जेरबंद करणे ही मोठी कामगिरी मानली जात आहे. देशमुख यांच्या कार्यतत्परतेचे आणि तपास कौशल्याचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी कौतुक केले.या कामगिरीची दखल घेत पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्या हस्ते अभिजीत देशमुख यांना प्रशंसापत्र प्रदान करून गौरविण्यात आले. देशमुख यांच्या या यशामुळे बेलापूर खुर्द तसेच श्रीरामपूर तालुक्यातील नागरिक, मित्रपरिवार आणि त्यांच्या आप्तेष्टांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. त्यांच्या कामगिरीचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.



## संत निरंकारी फाउंडेशनच्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद १२४ रक्तपिशव्यांचे संकलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई:** संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या सोनई शाखेच्या वतीने सोनई-घोडेगाव रोडवरील विश्वलक्ष्मी मंगल कार्यालय येथे रविवारी (दि. ९ ऑगस्ट) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. संत निरंकारी मंडळाचे सोनई शाखेचे मुखी आदरणीय विठ्ठलजी महाराज खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात एकूण १२४ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले.

शिबिराचा शुभारंभ जिल्हा परिषद बांधकाम समितीचे माजी सभापती तथा जि. प. सदस्य सुनीलजी गडाख, मुळा बँकेचे चेअरमन भाऊसाहेबजी निमसे, डॉ. शिरसाठ, विनायकजी दरंदले, प्रकाशजी शेटे, डॉ. रामनाथजी बडे, एस. बी. शेटे, सामाजिक कार्यकर्ते शिवाशेठजी बाफना, ब्रह्मकुमारी उषादीदी, संजयजी गर्जे, उदयजी पालवे, गणेशजी हापसे, बाळासाहेबजी ढाले यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयाच्या पथकाने रक्त संकलनाची प्रक्रिया पार पाडली. रक्तदान हे सामाजिक बांधिलकीचे कार्य असून, गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व मोठे असल्याचे उपस्थित मान्यवरांनी सांगितले.

या शिबिरासाठी विनायकजी होडशीळ, अरुणजी यादव, अशोकजी साळुंके, शाखाधिकारी सुहास वैरागर, बाळासाहेब शेटे यांच्यासह संत निरंकारी सेवादार व सत्संगातील महात्म्यांनी विशेष पुढाकार घेतला. माका, कुकाणा, देडगाव, शेवगाव आदी परिसरातील रक्तदात्यांनीही शिबिरात सहभाग नोंदविला.संत निरंकारी फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक, मानवतावादी आणि सेवाभावी उपक्रम सातत्याने राबविले जात असून, रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांनी सर्व रक्तदाते, स्वयंसेवक व सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचे आभार मानले.

**Change of Name**

oldneme: ANSAR YAKUB SAYYAD
ON MY OLD PASSPORT-J1200456
New Name is ANSAR YAKUBMIYA SAYYAD as on Adharcard Number is - 2469 7507 1009

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

सोमवार दि . १० ऑगस्ट २०२६

### मिलनम डे

उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १३७ / ३८० / ३२५ | १-० | १९० / २८० / ४६० | १२-९०-७४-५४-०६ |

### कल्याण

उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १२० / ६७० / ३३७ | ३-९ | १८० / २८९ / ३८८ | ३१-७३-२५-०८-९४ |

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| २८५ / ३७० / ४६० | ०-३ | १२० / ६७० / ३०० | ०६-४३-९२-७१-३५ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 15/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 03/08/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 10/08/2026 | 234 90 569 | 170 8 | | | |

द•ख•ल

## क्रांती दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे क्रांतिकारकांना अभिवादन



**अहिल्यानगर** : ९ ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने पक्ष कार्यालयात क्रांतिकारकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजास मानवंदना देत झेंडावंदन करण्यात आले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करून उपस्थितांनी क्रांतिकारकांना अभिवादन केले.

यावेळी खासदार निलेश लंके म्हणाले, ९ ऑगस्ट हा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. भारत छोडो आंदोलनाच्या माध्यमातून देशातील जनतेने ब्रिटिश सत्तेविरुद्ध निर्णायक लढा उभारला. असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले जीवन अर्पण केले. त्यांच्या त्यागामुळेच आज आपण स्वातंत्र्याचा श्वास घेत आहोत. क्रांतिकारकांचा संघर्ष आणि त्याग हा आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. लोकशाही, संविधानिक मूल्ये आणि देशाची एकता मजबूत ठेवणे हीच स्वातंत्र्यसैनिकांना खरी आदरांजली ठरेल.

## कापड बाजार मुख्य रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन



**अहिल्यानगर** : अहिल्यानगर शहरातील आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून बहुप्रतीक्षित कापड बाजार येथील मुख्य रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. यावेळी पालकमंत्री विखे पाटील यांनी शहरातील गुंडगिरी, दहशत, अतिक्रमण आणि अवैध धंद्यांविरोधात कडक भूमिका घेत दहशतमुक्त अहिल्यानगर शहर निर्माण करण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी बोलताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, अहिल्यानगर हे ऐतिहासिक शहर असून कापड बाजार पेठ राज्यभर प्रसिद्ध आहे.

आपण शाळेत जात असल्यापासून हा बाजार पाहत आहोत. मात्र काही लोक गुंडगिरीच्या जोरावर दहशत निर्माण करत असल्यामुळे व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर परिणाम होत आहे. त्यामुळे अहिल्यानगर शहर दहशतमुक्त करण्याच्या कामाची सुरुवात आमदार संग्राम जगताप यांनी कापड बाजारातून केली आहे. पोलीस प्रशासनाला आदेश देताना विखे पाटील म्हणाले की, तुमच्याकडे छेडछाड किंवा गुंडगिरीची तक्रार आली तर संबंधितांवर थेट कारवाई करा; अन्यथा त्याची जबाबदारी निश्चित केली जाईल. शहरातील अवैध धंदे तातडीने बंद करा. पोलिसांनी ऑपरेशन करून गुंडांचा बंदोबस्त करावा. शहरामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करणाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही.

## अहिल्यानगरकरांना संरक्षण देता येत नसेल तर सरकारने नागरिकांना बंदुका द्याव्यात

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर शहरातील धीरजसिंग परदेशी या युवकाच्या हत्येच्या गंभीर प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून उर्वरित फरार आरोपींना तात्काळ अटक करावी. तसेच या गुन्ह्यामागील मुख्य सूत्रधाराचा शोध घेऊन त्यालाही तात्काळ अटक करावी, अशी मागणी अहिल्यानगर शहर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) महानगर प्रमुख किरण काळे यांनी महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

अहिल्यानगर शहराची मर्डर सिटी होण्यामागे सरकार आणि पोलीस प्रशासनाच अपयश असल्याचा आरोप करत ठाकरे शिवसेनेने संताप व्यक्त केला आहे. दोषींना फासावर लटकवा, अशी मागणी काळे यांनी केली आहे. सरकारला अहिल्यानगरकरांना संरक्षण देता येत नसेल तर सरकारने नगरकरांना स्वतःच्या संरक्षणासाठी बंदुका द्याव्यात, अशी जहरी टीका काळेंनी केली आहे.

ठाकरे शिवसेनेने आक्रमक पवित्र घेतला आहे. काळे म्हणाले, या प्रकरणाचा तपास केवळ प्रत्यक्ष आरोपींपुरता मर्यादित न ठेवता, गुन्ह्याचे पूर्वनियोजन, कटकारस्थान तसेच आरोपींचे परस्पर संपर्क तपासण्यात यावेत. यासाठी सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल कॉल रेकॉर्ड, डिजिटल पुरावे, आर्थिक व्यवहार आणि अन्य वैज्ञानिक पुराव्यांची सखोल तपासणी करावी. तपास जलदगतीने पूर्ण करून सक्षम न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करावे. तसेच प्रकरण जलदगतीने चालविण्यासाठी आवश्यक तो पाठपुरावा करून ज्येष्ठ व अनुभवी विशेष सरकारी वकिलांची नियुक्ती करावी, अशी ठाकरे शिवसेनेने मागणी केली आहे.

# फिरोदिया शिवाजियन्स आंतरशालेय फुटबॉलमध्ये पोदार स्कूलचा दणदणीत विजय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर रविवारी (दि. ९ ऑगस्ट) चुरशीच्या फुटबॉल खेळाचा थरार अनुभवायला मिळाला. फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत विविध वयोगटांतील दोन सामने रंगले. एका सामन्यात पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या मुलींनी तब्बल चार गोल करत कर्नल परब स्कूलवर एकतर्फी विजय मिळवला, तर मुलांच्या सामन्यात ज्ञानसंपदा स्कूलने तक्षिला स्कूलचा प्रतिकार मोडून काढत १-० असा विजय नोंदविला. १६ वर्षांखालील मुलींच्या गटात पोदार इंटरनॅशनल स्कूल विरुद्ध कर्नल परब स्कूल यांच्यात झालेल्या सामन्यात पोदार स्कूलने सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेत मैदानावर वर्चस्व निर्माण केले. खेळाच्या सुरुवातीपासूनच प्रतिस्पर्धी संघाच्या गोलक्षेत्रावर दबाव निर्माण करणाऱ्या पोदारच्या खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट पासिंग आणि आक्रमक चालींच्या जोरावर गोलची संधी निर्माण केली. पोदार स्कूलकडून आरुषी गायकवाड हिने ८ व्या मिनिटाला गोल करत संघाचे खाते उघडले.





या गोलमुळे पोदारच्या खेळाडूंचा आत्मविश्वास आणखी वाढला. त्यानंतर काव्या झावरे हिने २१ व्या आणि ३८ व्या मिनिटाला सलग दोन गोल करत पोदार स्कूलची आघाडी ३-० अशी भक्कम केली. सामन्याच्या उत्तरार्धातही पोदारच्या खेळाडूंनी आक्रमक खेळ कायम ठेवला. आरुषी गायकवाड हिने ४३ व्या मिनिटाला आणखी एक गोल करत वैयक्तिक दुसरा आणि संघाचा चौथा गोल नोंदविला. अखेरपर्यंत पोदार स्कूलने कर्नल परब स्कूलला गोल करण्याची संधी दिली नाही. त्यामुळे पोदार इंटरनॅशनल स्कूलने कर्नल परब स्कूलचा ४-० गोलने पराभव करत दणदणीत विजय मिळविला.

१६ वर्षांखालील मुलांच्या गटात तक्षिला स्कूल विरुद्ध ज्ञानसंपदा स्कूल यांच्यात अटीतटीचा सामना रंगला. दोन्ही संघांनी सुरुवातीपासूनच बचाव आणि आक्रमण यांचा योग्य समन्वय साधत खेळ केला. त्यामुळे पहिल्या हाफमध्ये दोन्ही संघांना गोल करण्यात यश आले नाही. दुसऱ्या हाफमध्ये सामन्याची रंगत आणखी वाढली. दोन्ही संघांकडून गोल करण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू झाले. अखेर ज्ञानसंपदा स्कूलच्या शुभम सानप याने ४४ व्या मिनिटाला निर्णायक गोल करत संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. गोल झाल्यानंतर तक्षिला स्कूलने आक्रमक पवित्रा घेत सामना बरोबरीत आणण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न केले. मात्र ज्ञानसंपदा स्कूलच्या बचावफळीने भक्कम खेळ करत तक्षिलाच्या खेळाडूंना गोल करण्यापासून रोखले. अखेर शुभम सानपचा एकमेव गोल निर्णायक ठरला आणि ज्ञानसंपदा स्कूलने तक्षिला स्कूलवर १-० असा विजय मिळविला.

## सावता महाराजांनी कामामध्ये देव शोधला : आकाश महाराज फुले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : नगर तालुक्यातील नेप्ती येथे श्री संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त तीन दिवसीय अखंड हरिनाम सप्ताहास मोठ्या भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिरात श्री संत सावता महाराज तरुण मंडळ, माळी समाज व नेप्ती ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. ९ ऑगस्ट ते मंगळवार दि. ११ ऑगस्ट २०२६ या कालावधीत या धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती रामदास फुले यांनी दिली आहे. या सप्ताहाचे उद्घाटन ह.भ.प. शिवचरित्रकार आकाश महाराज फुले यांच्या हस्ते वीणा पूजन करून करण्यात आले. यावेळी माजी उपसरपंच जालिंदर शिंदे, माजी सरपंच अंबादास पुंड, ह.भ.प. शिवचरित्रकार आकाश महाराज फुले, समता परिषदेचे तालुकाध्यक्ष रामदास फुले, शाखा अध्यक्ष शाहूराजे होले, प्राध्यापक एकनाथ होले, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य शिवाजी होळकर, मुख्याध्यापक बाबा भोर, ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ पुंड ,संतोष चौरे, गोरख फुले, प्राध्यापक भाऊसाहेब पुंड ,पांडुरंग फुले, सिताराम बेल्हेकर, राजू फुले ,पाराजी होळकर, रोहन देशपांडे, सिताराम शिंदे, अनिल चहाळ, आण्णा होळकर, अशोक रावळे, तुकाराम होले, सचिन पुंड ,भोला नेमाने, रामातात्या होले , कैलास बेल्हेकर, तुषार भुजबळ , ओंकार भुजबळ, कैलास चौरे, बाबासाहेब चौरे, उत्तम फुले, तेजस नेमाने यांच्यासह ग्रामस्थ व परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संत सावता महाराजांनी केवळ भक्तीचा मार्ग सांगितला नाही, तर कष्ट, प्रामाणिकपणा आणि कर्माला भक्तीची जोड दिली. शेतात कष्ट करत असतानाही त्यांनी पांडुरंगाचे नामस्मरण सोडले नाही. त्यामुळे त्यांच्या जीवनातून 'कर्म हेच पूजन आणि प्रामाणिक कष्ट हीच खरी भक्ती' असा संदेश समाजाला मिळतो. संत सावता महाराजांचे विचार केवळ एका समाजापुरते मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीला मार्गदर्शन करणारे आहेत. आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात त्यांच्या विचारांची गरज अधिक आहे. सावता महाराजांनी कामामध्ये देव शोधला असे प्रतिपादन शिवचरित्रकार आकाश महाराज फुले यांनी केले .

## जिल्हास्तरीय ज्युनिअर थलेटिक्स स्पर्धा १५ व १६ ऑगस्ट रोजी लोणीत रंगणार खेळाडूंना सहभागी होण्याचे आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : अहिल्यानगर जिल्हा थलेटिक्स असोसिएशनच्या वतीने 'अहिल्यानगर जिल्हास्तरीय कनिष्ठ गट मैदानी स्पर्धा (ज्युनिअर थलेटिक्स) अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२०२७' चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा आगामी १५ आणि १६ ऑगस्ट २०२६ रोजी लोणी येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात पार पडणार असल्याची माहिती असोसिएशनच्या वतीने देण्यात आली आहे. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व क्वालिफायिंग स्टँडर्ड्स पूर्ण करणाऱ्या खेळाडूंची डेरवण (जि. रत्नागिरी) येथे दिनांक २७ ते ३० ऑगस्ट रोजी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड केली जाणार आहे.

या स्पर्धेत खेळाडूंना सहभागी होण्याचे आवाहन असोसिएशनचे अध्यक्ष सुनील जाधव, उपाध्यक्ष राजेंद्र कोतकर व सचिव दिनेश भालेराव यांनी केले आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खेळाडूंना स्पर्धेच्या दोन्ही दिवशी ऑफलाईन पद्धतीने प्रवेशिका जमा करता येतील. ही स्पर्धा केवळ अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंसाठीच आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये १४, १६, १८ आणि २० वर्षांखालील अशा चार वयोगटांचा समावेश असून, खेळाडूचे वय किमान १२ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. खेळाडूंनी वय पडताळणीसाठी येथे येताना सक्षम प्राधिकाऱ्याचा जन्माचा दाखला (ज्याची नोंदणी जन्मानंतर दोन वर्षांच्या आत झालेली असावी), १० वीचे बोर्ड प्रमाणपत्र आणि आधार कार्ड ही मूळ कागदपत्रे सोबत आणणे गरजेचे आहे. शनिवार, १५ ऑगस्ट रोजी सकाळी १:०० वाजल्यापासून स्पर्धा स्थळी ऑनलाइन नोंदणी केलेल्या खेळाडूंना चेस्ट नंबरचे वाटप केले जाईल. स्पर्धा संपल्यानंतर चेस्ट नंबर जमा केल्यावर सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल, तर वयाची पडताळणी झाल्यानंतर आणि संबंधित खेळ प्रकारात किमान ४ खेळाडू असल्यास प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना गुणवत्ता प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. या स्पर्धेसाठी निवास व जेवण याची कोणतीही व्यवस्था आयोजकांकडून केली नसून, ती खेळाडू व पालकांनी स्वतः करावी लागणार आहे.

तसेच स्पर्धेदरम्यान होणाऱ्या कोणत्याही दुखापतीला किंवा नुकसानीला असोसिएशन जबाबदार राहणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी खेळाडूंनी दिनेश भालेराव ९९२३८३७८८८, श्रीरामसेतु आवारी ९३२२०१५०४६, जगन गवांदे ९८८१३२८१८६, सुजय बाबर ७५०७६८१७२६, यांच्याशी संपर्क साधण्याचे म्हंटले आहे.

## मोफत आरोग्य, रक्त तपासणी व औषधोपचार शिबिर संपन्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : नागरिकांपर्यंत दर्जेदार आरोग्य सुविधा पोहोचाव्यात या उद्देशाने अहिल्यानगर महानगरपालिका व साईदीप सह्याद्री हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सामाजिक कार्यकर्ते ड. अवधूत फुलसौंदर यांच्या प्रयत्नातून आयोजित करण्यात आलेले मोफत आरोग्य, रक्त तपासणी व औषधोपचार शिबिर उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाले. शिबिराचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात विविध तज्ज्ञ डॉक्टरांनी शेकडो रुग्णांची तपासणी करून मोफत वैद्यकीय सल्ला व औषधोपचार दिले. यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, नागरिकांमध्ये विविध प्रकारच्या आरोग्य समस्या वाढत असून त्यांना अधिकाधिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे.

गरजू रुग्णांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी अशा मोफत आरोग्य शिबिरांचे सातत्याने आयोजन होणे आवश्यक आहे. अशा शिबिरांमधन प्राथमिक तपासणी होऊन आजारांचे वेळेत निदान होते व डॉक्टरांना योग्य वेळी उपचार करता येतात. ते पुढे म्हणाले की, महिलांच्या आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. महिला ही कुटुंबाचा कणा असून तिचे आरोग्य सुदृढ असेल तर संपूर्ण कुटुंब निरोगी राहते. थॅलेसेमियासारख्या आजारांमुळे अनेक रुग्णांना नियमित रक्ताची गरज असते. मात्र रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा मोठा तुटवडा जाणवत आहे.

त्यामुळे युवकांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून गरजू रुग्णांना जीवनदान देण्यासाठी पुढे यावे. प्रत्येकाने रक्तदानाचा संकल्प करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी माजी महापौर भगवान फुलसौंदर यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत त्यांच्या सामाजिक कार्याचा वारसा ड. अवधूत फुलसौंदर समर्थपणे पुढे नेत असल्याचे सांगितले. समाजात वावरताना समाजाचे काहीतरी देणे लागते या भावनेतून प्रत्येकाने सामाजिक बांधिलकी जपत लोकहिताचे कार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमास माजी महापौर भगवान फुलसौंदर, उपमहापौर ड. धनंजय जाधव, माजी उपमहापौर गणेश भोसले, अनिल बोरुडे, माजी स्थायी समिती सभापती अविनाश घुले, मर्चंट बँकेचे चेअरमन संजय चोपडा, नगरसेवक प्रकाश भागानगरे, प्रा. माणिक विधाते, नगरसेवक दत्ता गाडळकर, मयूर बांगरे, जालिंदर कोतकर, नगरसेविका सुनीता फुलसौंदर, नगरसेविका मीनाताई चोपडा, बाळासाहेब बारस्कर, अशोक बाबर, महादेव कराळे, जालिंदर बोरुडे, गोरख पडोळे, भाऊसाहेब पांडुळे, सुजित काकडे, अशोक दहिफळे, अलका मुंदडा, गौरव बोरुडे, विष्णू फुलसौंदर, विशाल पवार, प्रदीप बोरुडे, गोरख बोरुडे, अमित घाडगे, सुमित लोंढे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भिंगारमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासाठी २० गुंठे जागा व निधी उपलब्ध करून द्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : भिंगार शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासह स्मारकासाठी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी भिंगार शहरातील समस्त आंबेडकर-बौद्ध समाजाच्या वतीने केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

त्याचवेळी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी ३ कोटी निधी देण्याचे आश्वासन दिले. भिंगार शहरातील सामाजिक कार्यकर्ते, आंबेडकर अनुयायी तसेच नागरिकांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार, सामाजिक





समता, शिक्षण आणि संविधानिक मूल्यांची जपणूक करण्यासाठी भिंगार शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारणे अत्यंत आवश्यक आहे.

भिंगार परिसरात आजपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने योग्य स्वरूपाचे स्मारक उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना, युवकांना तसेच सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या महान कार्याची प्रेरणा मिळण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली.

लवकरच आमदार.संग्राम भैय्या जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली स्मारक उभारणीसाठी अहिल्यानगर छावणी परिषदेच्या मालकीची नगर-पाथर्डी रस्त्यालगत, जुन्या बसस्थानकाजवळील सुमारे २० गुंठे मोकळी जागा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. संबंधित जागेचे मोजमाप करून नियमानुसार प्रस्ताव तयार करून मंजूर करण्यात यावा तसेच स्मारक उभारणीसाठी आवश्यक प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारल्यामुळे भिंगार परिसराच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासाला चालना मिळेल. तसेच संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचा प्रसार होण्यास मदत होईल. त्यामुळे स्मारकासाठी आवश्यक मोकळी जागा तातडीने उपलब्ध करून देऊन निधी मंजूर करावा आणि आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी आंबेडकर-बौद्ध समाजाच्या वतीने करण्यात आली.

यावेळी संभाजीराव भिंगारदिवे, सिद्धार्थ आढाव, प्रदीप जाधव, अक्षय भिंगारदिवे, सुरेश वाघमारे, सृजन भिंगारदिवे, भाऊ भिंगारदिवे, गौतम वाघमारे, मच्छिंद्र भिंगारदिवे, सिद्धार्थ भिंगारदिवे, पवन भिंगारदिवे, संदीप वाकचौरे, अमित काळे, अजिंक्य भिंगारदिवे, मयूर पाखरे, अजय पाखरे, दीपक अमृत, अजय भिंगारदिवे, संजय भिंगारदिवे यांच्यासह भिंगार शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कुत्र्यांच्या हल्ल्यातून मोराची सुटका । रीलस्टार हर्षदा जाधव हीच सन्मान



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : अहिल्यानगरहून शिक्रापूरकडे प्रवास करत असताना रस्त्यावर तीन कुत्रे एका मोरावर हल्ला करत असल्याचे दिसताच प्रसिद्ध रील्सस्टार हर्षदा जाधव हिने प्रसंगावधान राखत मोराची सुटका केली. ही घटना सुपा येथे घडली.

जखमी मोराला वनविभाग पारनेरच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत उपचारासाठी पशुवैद्यकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

शिक्रापूर (ता. शिरूर) येथील प्रसिद्ध रील्सस्टार हर्षदा जाधव ही अहिल्यानगरहून शिक्रापूरकडे प्रवास करत होती. यावेळी सुपा परिसरातून जात असताना रस्त्याच्या कडेला तीन कुत्रे एका मोरावर हल्ला करत असल्याचे तिच्या निदर्शनास आले. कुत्र्यांच्या हल्ल्यामुळे मोर जखमी होऊन जीवाच्या आकांताने धडपडत होता. ही परिस्थिती पाहताच हर्षदा हिने तत्काळ आपला प्रवास थांबवत मोराच्या मदतीसाठी धाव घेतली.

कुत्र्यांना बाजूला करत हर्षदा हिने धाडसाने मोराला त्यांच्या तावडीतून बाहेर काढले. यावेळी विशाल रुके आणि बबन रुके यांनीही मदतीसाठी पुढाकार घेतला. तिघांनी मिळून जखमी मोराला सुरक्षितपणे ताब्यात घेतले. मोराच्या शरीरावर जखमा झाल्याचे लक्षात आल्यानंतर हर्षदा हिने तातडीने वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली.

घटनेची माहिती मिळताच वनविभाग पारनेरच्या अधिकाऱ्यांनी तत्परता दाखवत आवश्यक कार्यवाही केली. वनविभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत जखमी मोराला पशुवैद्यकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यामुळे वेळेत उपचार मिळण्यास मदत झाली.


## जाहिर नोटीस

तमाम लोकांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

आमचे अशिल सुनिल एकनाथ वाणी व सौ. सिमा सुनिल वाणी यांनी दिलेल्या माहितीवरुन व दाखवलेल्या कागदपत्रावरुन आमचे अशिलांकडून श्री. रामदास मारुती शिंदे, रा. गोंधवणी, ता. श्रीरामपूर यांनी रक्कम रु. १७,००,०००/- एवढ्या रक्कमेचे व्याजापोटी मौजे मातुलठाण, ता. श्रीरामपूर, जि. अ.नगर येथील आमचे अशिलांचे मालकीची पुढील नमुद शेत जमिनीचे संदर्भाने जनरल मुखत्यारपत्र (दिनांक २८ मार्च २०२४, दस्त क्र. १८१७), (दिनांक २१/०५/२०२४, दस्त क्र. २६९८), (दि. २९/०८/२०२४, दस्त क्र. ४६६८) व आमचे अशिल सौ. सिमा सुनिल वाणी यांचेकडून लिहून घेतलेले जनरल मुखत्यारपत्र दिनांक २४/१२/२०२४, दस्त क्र. ६९१२ मे. दुय्यम निबंधक साहेब, श्रीरामपूर यांचे कार्यालयात आमचे अशिलांच्या असहाय्यतेचा व आर्थिक परिस्थितीचा गैरफायदा घेवून जबरदस्तीने नोंदविलेले आहेत.

मिळकतीचे वर्णन :-

| मिळकत क्र. | क्षेत्र | ज्याचे कडुन नोंदवून घेतलेले त्यांचे नाव |
|---|---|---|
| गट नं. २१०अ पैकी | ००-६० आर | सुनिल एकनाथ वाणी, रा. मातुलठाण, ता. श्रीरामपूर |
| गट नं. २१०अ पैकी | ०१-२० आर | सुनिल एकनाथ वाणी, रा. मातुलठाण, ता. श्रीरामपूर |
| गट नं. २१०अ पैकी | ००-८० आर | सुनिल एकनाथ वाणी, रा. मातुलठाण, ता. श्रीरामपूर |
| गट नं. २६० | ००-९९ आर | सौ. सिमा सुनिल वाणी, रा. मातुलठाण, ता. श्रीरामपूर |

श्री. रामदास मारुती शिंदे, रा. गोंधवणी, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर यांना सदरचे जनरल मुखत्यारपत्राचे आधारे स्वतःचे नावे खरेदी घेणेचा हक्क व अधिकार नसतांना सदरहु मिळकतीच्या संबंधाने परस्पर लबाडीने व अप्रमाणिक हेतुने खरेदीची किंमत अदा न करता परस्पर मे. दुय्यम निबंधक कार्यालय, नेवासा यांचे समोर खरेदीखत दस्त क्र. ४३२७, ४३३०, ४३३१ व ४३३३ नोंदविल्याचे आमचे अशिलांना नुकतेच समजले आहे. श्री. रामदास मारुती शिंदे यांनी आजपावेतो आमचे अशिलांना खरेदीखतात दर्शविलेली भरणा रक्कम दिलेली नाही. याबाबत संबंधित कार्यालयाकडे आमचे अशिलांनी रितसर तक्रार दाखल केलेली आहे.

सबब या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, श्री. रामदास मारुती शिंदे यांनी केलेल्या बोगस खरेदीखताचे आधारे वर नमुद मिळकतीवर यापुढे सोसायटी, विविध शासकीय बँक, राष्ट्रीयकृत बँका, पतसंस्था, अथवा खाजगी वित्तसंस्था यांचेकडुन कर्जावु रक्कम घेवुन सदर मिळकतीवर बोजे निर्माण करण्याची शक्यता आहे. तसेच मिळकतीची परस्पर विक्री हस्तांतरण, विल्हेवाट लावण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी आजरोजी या जाहीर नोटीसीने उपरोक्त मिळकती संदर्भाने दि. २८/०३/२०२४, २१/०५/२०२४, २९/०८/२०२४ व दि. २४/१२/२०२४ रोजी आमचे अशिलांकडून श्री. रामदास मारुती शिंदे यांनी करुन घेतलेले जनरल मुखत्यारपत्र रद्द करीत आहोत.

सबब यापुढे श्री. रामदास मारुती शिंदे यांचेशी वर नमुद मिळकती संदर्भात त्यांनी आमचेकडून करुन घेतलेल्या वरील मुखत्यारपत्राचे आधारे कोणताही आर्थिक व्यवहार अथवा गहाण, दान, लिन, लिज, बक्षीसपत्र, भाडेपट्टा, विसार पावती, खरेदीखत, अथवा वित्तीय संस्थेचा कर्जाचा बोजा करु नये. तसे केल्यास तो सदर मिळकतीवर अथवा आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसवणूक होवू नये याकारीता ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे याची नोंद घ्यावी.

श्रीरामपूर
दिनांक- ०७/०८/२०२६

अशिलातर्फे व करिता
**(ॲड. एस. एस. बागवान)**
श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर,
मोबा. नं. ९४२३७८६०९८

# बेकायदेशीर कृषी निविष्ठा विक्रेत्यांवर कारवाई

## उरुळी कांचन, शिंदवणे येथील दोन विक्रेत्यांविरुद्ध गुन्हे; परवाना निलंबित असतानाही बियाणे विक्री

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** हवेली तालुक्यातील उरुळी कांचन व शिंदवणे परिसरातील बियाणे, खते आणि कीटकनाशके विक्रेत्यांच्या बेकायदेशीर कारभारावर कृषी विभागाच्या जिल्हास्तरीय भरारी पथकाने धडक कारवाई केली आहे. परवाना निलंबित असतानाही बियाण्यांची विक्री करणाऱ्या उरुळी कांचन येथील 'साई शेती भांडार' तसेच मुदत संपलेल्या परवान्यावर आणि अनधिकृत ठिकाणी खते, बियाणे व कीटकनाशकांची विक्री करणाऱ्या शिंदवणे येथील 'कौशल्या शेती भांडार' या दोन विक्रेत्यांविरुद्ध उरुळी कांचन पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक धनंजय दिनकर पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १६ जुलै रोजी 'साई शेती भांडार'ची तपासणी करण्यात आली होती. त्यावेळी साठा नोंदवही न ठेवणे, परवान्यात उत्पादक कंपनीचा समावेश नसणे आदी गंभीर त्रुटी आढळून आल्या. या प्रकरणी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा परवाना अधिकाऱ्यांनी २२ जुलै रोजी सुनावणी घेऊन संबंधित दुकानाचा बियाणे विक्री परवाना १५ दिवसांसाठी निलंबित केला होता.

मात्र, निलंबनाचा आदेश लागू असतानाच २ ऑगस्ट रोजी सायंकाळी भरारी पथकाने अचानक तपासणी केली असता दुकान सुरू असल्याचे आढळले. तपासणीदरम्यान २८ जुलै ते २ ऑगस्ट या कालावधीत पालक, मका, काकडी आणि शेपूच्या बियाण्यांची विक्री झाल्याचे बिल पुस्तकावरून स्पष्ट झाले. त्यामुळे दुकानाचे मालक बाळासाहेब उल्हास साळुंखे यांच्याविरुद्ध बियाणे नियंत्रण आदेश, १९८३ तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या कारवाईत शिंदवणे येथील 'कौशल्या शेती भांडार'ची तपासणी मोहीम अधिकारी विनय दिलीपराव कदम यांच्या फिर्यादीनुसार करण्यात आली. तपासणीवेळी दुकान चालक पोपट तुकाराम महाडीक यांच्या बियाणे व खत विक्री परवान्याची मुदत २३ नोव्हेंबर २०२५ रोजीच संपल्याचे आढळून आले. परवाना नूतनीकरण न करता ते खते व बियाण्यांची विक्री करत असल्याचे स्पष्ट झाले. याशिवाय, कीटकनाशक विक्रीचा परवाना उरुळी कांचन–जेजुरी मार्गावरील एका ठिकाणासाठी असताना प्रत्यक्षात वळती फाटा येथील दुसऱ्याच ठिकाणी साठवणूक व विक्री सुरू असल्याचेही तपासणीत उघड झाले. या प्रकरणीही संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक रोखणे, बनावट व निकृष्ट कृषी निविष्ठांचा पुरवठा थांबविणे आणि कृषी क्षेत्राचे नुकसान टाळणे या उद्देशाने शासनाच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले. दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास उरुळी कांचन पोलिस ठाण्याचे प्रभारी पोलिस निरीक्षक महेश विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

**भरारी पथकातील अधिकारी या कारवाईत जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक धनंजय पाटील, कृषी अधिकारी अशोक वेताळ आणि मोहीम अधिकारी विनय कदम यांनी सहभाग घेतला. कृषी निविष्ठांच्या विक्रीतील अनियमितता रोखण्यासाठी अशा तपासण्या पुढेही सुरू राहणार असल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले.**

## दखल

### दौंड तहसीलदारांच्या चौकशीची मागणी

**दौंड :** दौंडचे तहसीलदार अरुण शेलार यांची चौकशी करून निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी रयत क्रांती संघटनेचे राज्य प्रवक्ते भानुदास शिंदे यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या प्रकरणाची चौकशी व कारवाई न झाल्यास कानगाव येथे स्वातंत्र्यदिनी होणाऱ्या आमरण उपोषणात हा मुद्दा समाविष्ट करण्यात येईल, असा इशाराही शिंदे यांनी दिला.

दौंड तहसील कार्यालयात महा-ई-सेवा केंद्रांच्या आयडीचा गैरवापर, अधिकारी व कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती, नागरिकांची कामे पैशांशिवाय न करणे, खरेदीखत व वारस नोंदी तसेच रस्ते मोजणीची कामे प्रलंबित ठेवणे आणि बोगस जमीन नोंदणी यांसारखे गंभीर प्रकार सुरू असल्याचा आरोप शिंदे यांनी केला आहे. महापुरुषांच्या नावाने राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व अभियानांमध्येही भ्रष्टाचार झाल्याचा आरोप त्यांनी केला.कानगाव येथे स्वातंत्र्यदिनी रयत क्रांती संघटनेच्या वतीने विविध मागण्यांसाठी आमरण उपोषण करण्यात येणार आहे. कर्जमाफीपासून वंचित शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत सरसकट अनुदान, तसेच अदानी सिमेंट कंपनी व श्री सिमेंट कंपनीकडून होणाऱ्या प्रदूषणावर आणि ओव्हरलोड वाहतुकीवर कारवाई करण्यासह आठ मागण्या या उपोषणात करण्यात येणार आहेत.दरम्यान, कानगाव ग्रामपंचायतीला चार वर्षांपूर्वी महा-ई-सेवा केंद्राचा आयडी देण्यात आला असतानाही ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांना याची माहिती नसल्याचा दावा शिंदे यांनी केला आहे. या सर्व प्रकरणांची चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

### श्रावणी यात्रेपूर्वी रोहकड वेस–देवस्थान रस्ता दुरुस्तीची मागणी



**आळेफाटा :** ओतूर येथील रोहकड वेस ते देवस्थान या महत्त्वाच्या मार्गाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून, श्रावणी यात्रेपूर्वी रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी भाविक व ग्रामस्थांकडून होत आहे.या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठ्या व्यासाचे खड्डे पडले असून, रस्त्यावरील डांबर उखडले आहे. तसेच दगड-गोटे मोठ्या प्रमाणात पसरल्याने वाहनचालक आणि पादचाऱ्यांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसामुळे खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने रस्त्याची अवस्था आणखी बिकट झाली आहे.ओतूर येथील श्रावणी यात्रेला दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहतात. यंदाची यात्रा १७ ऑगस्टपासून सुरू होणार असल्याने त्यापूर्वीच रस्त्याची दुरुस्ती करणे गरजेचे आहे. रस्त्याची सध्याची परिस्थिती पाहता मोठ्या प्रमाणावर भाविकांची व वाहनांची गर्दी झाल्यास अपघाताचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन रोहकड वेस ते देवस्थान रस्त्यावरील खड्डे बुजवावेत, उखडलेला रस्ता दुरुस्त करावा तसेच दगड-गोटे हटवून मार्ग वाहतुकीस सुरक्षित करावा, अशी मागणी ग्रामस्थ व भाविकांनी केली आहे. लाखो भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन प्रशासनाने दुर्लक्ष न करता यात्रेपूर्वी रस्त्याची कामे पूर्ण करावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### पुणे–नाशिक रेल्वेसाठी आळेफाट्यावर चक्काजाम



**आळेफाटा :** पुणे–नाशिक रेल्वे प्रकल्पाला होणारा विलंब दूर करून तातडीने मार्गाला मंजुरी द्यावी, या मागणीसाठी आळेफाटा चौकात रविवार, ९ ऑगस्ट रोजी सर्वपक्षीय चक्काजाम आंदोलन करण्यात आले. 'अभी नहीं तो कभी नहीं' अशा घोषणांनी आळेफाटा परिसर दणाणून गेला. सकाळी साडेदहा वाजता मोठ्या संख्येने नागरिक व ग्रामस्थ आळेफाटा चौकात जमले होते. आंदोलकांनी हातात विविध मागण्यांचे फलक घेत रेल्वे प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याची मागणी केली. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आळेफाटा पोलिसांकडून चौकात चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.पुणे–नाशिक रेल्वे मार्गाला केंद्र व राज्य सरकारने तातडीने मंजुरी द्यावी तसेच कळंब, शिवनेरी आणि जुन्नर परिसर रेल्वे जाळ्याशी जोडावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. रेल्वे मार्गामुळे शेतीमालाची वाहतूक सुलभ होऊन खर्च कमी होईल. तसेच शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि पर्यटन क्षेत्राला मोठी चालना मिळेल, असा दावा आंदोलकांनी केला. जुन्नर तालुका व शिवनेरी परिसर अद्याप रेल्वेपासून दूर असल्याने नागरिकांना पुणे व नाशिक येथे जाण्यासाठी मोठा वेळ आणि खर्च करावा लागतो. पुणे–नाशिक रेल्वे सुरू झाल्यास या भागाच्या विकासाला नवसंजीवनी मिळेल, अशी भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. पावसाचे वातावरण असतानाही नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. प्रशासनाला निवेदन देण्यात आल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. मात्र, आगामी काळात रेल्वे प्रकल्पाबाबत ठोस निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा आंदोलकांनी दिला.

## गोळीबार प्रकरणातील तिघे इंदोरमधून जेरबंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वाघोली :** गावडेवाडी–शिरसवडी रस्त्यावर व्यावसायिकावर गोळीबार करून त्याच्याकडील सुमारे २२ तोळे सोन्याच्या दोन साखळ्या लुटल्याच्या प्रकरणाचा पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने २४ तासांत छडा लावला. याप्रकरणी तिघांना मध्य प्रदेशातील इंदोर येथून अटक करण्यात आली आहे.

बुधवारी (दि. ५) रात्री संतोष गावडे हे कामावरून घरी जात असताना गावडेवाडी–शिरसवडी रस्त्यावर तीन अनोळखी व्यक्तींनी त्यांच्यावर गोळीबार केला. या हल्ल्यात गावडे गंभीर जखमी झाले. त्यानंतर आरोपींनी त्यांच्या गळ्यातील प्रत्येकी सुमारे ११ तोळे वजनाच्या दोन सोनसाखळ्या जबरदस्तीने हिसकावून घेत पलायन केले. याप्रकरणी लोणीकंद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन गुन्हे शाखा, युनिट–७ तसेच दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक–२ यांनी तपास सुरू केला. घटनास्थळावरील तांत्रिक विश्लेषण, मोटारसायकलच्या हालचाली आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढण्यात आला. त्यानंतर पोलिस पथकाने इंदोर येथे पाठलाग करून तिघांना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्यांमध्ये अविनाश कृष्णचंद त्रिपाठी (वय ४३, रा. बकोरी, मूळ उत्तर प्रदेश), सुरेंद्रपाल रामचंद्र पाल (वय ३२, मूळ उत्तर प्रदेश) आणि मोहम्मद शोएब वसीम खान (वय ३७, मूळ उत्तर प्रदेश) यांचा समावेश आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी अविनाश त्रिपाठी याच्यावर उत्तर प्रदेश आणि नेपाळमध्ये दरोडा, खून, खुनाचा प्रयत्न यांसह सुमारे २० गंभीर गुन्हे दाखल आहेत.

## पतसंस्थांच्या एसएलआरसाठी पीडीसीसी बाँडला मान्यता

### ४१७ कोटींच्या बाँडची विक्री; ११ ऑगस्टपर्यंत संधी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील नागरी तसेच ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांनी वैधानिक तरलता प्रमाण (एसएलआर) राखण्यासाठी केलेल्या एकूण गुंतवणुकीपैकी पाच टक्के गुंतवणूक पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (पीडीसीसी) कर्जरोख्यांमध्ये केल्यास ती एसएलआरसाठी ग्राह्य धरण्यास शासनाने मान्यता दिली आहे. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने ६ ऑगस्ट रोजी याबाबत शासन आदेश जारी केला आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम १५७ अन्वये ही मान्यता देण्यात आली आहे. बिगरशेती सहकारी पतसंस्थांना त्यांच्या एकूण ठेवींच्या किमान २५ टक्के रक्कम वैधानिक तरलतेसाठी गुंतवणे आवश्यक आहे. या गुंतवणुकीपैकी पाच टक्के रक्कम पीडीसीसी बँकेच्या कर्जरोख्यांमध्ये गुंतविल्यास ती एसएलआरसाठी ग्राह्य धरली जाणार आहे.

पीडीसीसी बँकेने २८ जुलै २०२६ रोजी शासनाकडे याबाबत प्रस्ताव सादर केला होता. भारतीय रिझर्व्ह बँकेने १२ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या पत्राद्वारे पीडीसीसी बँकेला १५० कोटी रुपयांपर्यंत परपेच्युअल डेट इन्स्ट्रुमेंट्स (पीडीआय) आणि ५०० कोटी रुपयांपर्यंत लाँग टर्म सबऑर्डिनेटेड बाँड्स (एलटीएसबी) उभारण्यास मान्यता दिली आहे.

दरम्यान, २२ जुलै ते ७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत पीडीसीसी बँकेच्या ४१७ कोटी २७ लाख ३० हजार रुपयांच्या कर्जरोख्यांची विक्री झाली आहे. या कर्जरोख्यांच्या खरेदीची अंतिम मुदत मंगळवार (ता. ११) आहे. जिल्ह्यातील नागरी व ग्रामीण सहकारी पतसंस्थांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन पीडीसीसी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय शितोळे यांनी केले आहे.

पीडीसीसी बँक सातत्याने 'अ' वर्ग लेखापरीक्षणात असून आर्थिकदृष्ट्याही सक्षम आहे. मार्च २०२६ अखेर बँकेचे नक्त मूल्य ३ हजार ४०९ कोटी रुपये असून, भांडवल पर्याप्तता प्रमाण १०.६८ टक्के आहे. पतसंस्थांनी पीडीसीसी बँकेत केलेली मुदत ठेवीच्या स्वरूपातील गुंतवणूक यापूर्वीपासूनच वैधानिक तरलतेसाठी ग्राह्य धरली जाते. आता कर्जरोख्यांमधील पाच टक्के गुंतवणुकीला मान्यता मिळाल्याने पतसंस्थांना एसएलआरसाठी आणखी एक पर्याय उपलब्ध झाला आहे. या निर्णयामुळे पीडीसीसी बँकेच्या भांडवलवृद्धीला चालना मिळण्याबरोबरच पतसंस्थांना नियमानुसार गुंतवणुकीची संधी उपलब्ध झाली आहे. या निर्णयाची माहिती जिल्ह्यातील नागरी व ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था तसेच पतसंस्था फेडरेशनला देण्याचे निर्देश अपर आयुक्त तथा विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिले आहेत.

## मद्य पेयांवरही एफडीएची नजर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** खाद्यपदार्थांप्रमाणेच मद्य आणि मद्यार्क नसलेल्या पेयांच्या गुणवत्ता, उत्पादन व लेबलिंगवर अन्न व औषध प्रशासनाचे (एफडीए) बारकाईने लक्ष राहणार आहे. भेसळयुक्त अन्नपदार्थ, विषारी दारू किंवा निकृष्ट पेयांमुळे नागरिकांच्या आरोग्याशी खेळ खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला.

'पुणे लोकल' आणि 'माय जनसेवक' यांच्या संयुक्त विद्यमाने बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित 'भविष्यवेध – संवाद भविष्याचा' उपक्रमातील 'अनस्टॉपेबल तुकाराम' या मुलाखतीत ते बोलत होते. लेखक अरविंद जगताप आणि पत्रकार प्रशांत आहेर यांनी त्यांची मुलाखत घेतली. मुंढे म्हणाले, खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत कायद्याने ठरविलेल्या मानकांचे पालन आवश्यक आहे. दूध, पनीर आणि खाद्यतेलांप्रमाणेच अल्कोहोलिक व नॉन-अल्कोहोलिक पेयांचीही तपासणी केली जाईल. भेसळयुक्त अन्न, विषारी ताडी-दारू आणि निकृष्ट पदार्थ नागरिकांच्या आरोग्यासाठी धोकादायक आहेत. एफडीएकडून तक्रारींसाठी टोल-फ्री क्रमांक सुरू करण्यात आला असून नागरिकांनीही सजग राहावे. तरुणांना मार्गदर्शन करताना त्यांनी अपयशातून शिकण्याचा, अंधानुकरण टाळण्याचा आणि स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्याचा सल्ला दिला.



स्वयं–एनपीटीएलच्या 'बेस्ट न्यू लोकल चॅप्टर' राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित डॉ. शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ अ‍ॅग्रीकल्चर, बारामतीचे विद्यार्थी व प्राध्यापक.

## स्वयं–एनपीटीएलमध्ये बारामतीच्या कृषी महाविद्यालयाची बाजी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** अ‍ॅग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संचलित डॉ. शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ अ‍ॅग्रीकल्चरला स्वयं–एनपीटीएल आणि आयआयटी मद्रास यांच्या वतीने 'बेस्ट न्यू लोकल चॅप्टर' हा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. स्वयं प्लॅटफॉर्मवरील ऑनलाइन अभ्यासक्रमांमध्ये महाविद्यालयाने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत हा सन्मान करण्यात आला.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार कृषी विद्यार्थ्यांना विविध ऑनलाइन अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानुसार महाविद्यालयाने स्वयं प्लॅटफॉर्मवर 'लोकल चॅप्टर' म्हणून नोंदणी केली. जानेवारी ते एप्रिल २०२६ या सत्रातील एनपीटीएल ऑनलाइन प्रमाणपत्र परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. टॉप २०० क्रमवारीबाहेरील लोकल चॅप्टर्समधून महाविद्यालयाची 'बेस्ट न्यू एलसी' पुरस्कारासाठी निवड झाली.

चतुर्थ सत्रातील कृषी व एबीएमच्या विद्यार्थ्यांसाठी 'सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट' आणि 'बिझनेस डेव्हलपमेंट फ्रॉम स्टार्ट टू स्केल' हे अभ्यासक्रम घेण्यात आले. त्यामध्ये ९८ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. द्वितीय सत्रातील 'एन्हांसिंग सॉफ्ट स्किल्स' अभ्यासक्रमाचा निकाल ९० टक्के लागला. काही गुणवंत विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत सुवर्णपदक मिळवले. या उपक्रमाचे समन्वयक म्हणून ऑनलाइन अभ्यासक्रम विभागाचे प्रा. राहुल मारुती बेलदार व डॉ. पद्मकुमार पाटील यांनी काम पाहिले. या यशाबद्दल अ‍ॅग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन राजेंद्र पवार व विश्वस्त सुनंदा पवार यांनी विद्यार्थ्यांचे आणि प्राध्यापकांचे अभिनंदन केले.शिक्षण संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश नलावडे, कृषी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एस. पी. गायकवाड आणि एबीएम महाविद्यालयाच्या प्राचार्या आरती भोईटे यांनीही विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

## स्वतःचे व्हिजन ठेवा, सद्विवेकाला फॉलो करा : तुकाराम मुंढे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** तरुणांनी कोणाचेही अंधानुकरण न करता स्वतःची स्वप्ने, सद्विवेक आणि अंतरात्म्याला अनुसरून वाटचाल करावी. प्रवाहासोबत वाहून न जाता समाजात सकारात्मक बदल घडविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी केले.

'पुणे लोकल' आणि 'माय जनसेवक' यांच्या संयुक्त विद्यमाने बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित 'भविष्यवेध – संवाद भविष्याचा' उपक्रमांतर्गत 'अनस्टॉपेबल तुकाराम' या विशेष मुलाखतीत ते बोलत होते. लेखक अरविंद जगताप आणि वरिष्ठ पत्रकार प्रशांत आहेर यांनी मुंढे यांची मुलाखत घेतली. यावेळी मुंढे यांनी बालपणापासूनचा संघर्ष, यूपीएससीतील अपयश, प्रशासकीय कारकीर्द आणि अन्न सुरक्षेशी संबंधित कामकाजावर मनमोकळेपणाने भाष्य केले. 'यशाकडे पाहताना त्यामागील संघर्षही पाहिला पाहिजे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत दोन वेळा अपयश आले. मात्र खचून न जाता पीएचडी सुरू केली, नेट परीक्षा उत्तीर्ण झालो, तासिका तत्त्वावर प्राध्यापक म्हणून काम केले आणि एमपीएससी उत्तीर्ण झाल्यानंतरही यूपीएससीची तयारी सुरू ठेवली. ११ मे २००५ रोजी यशदामध्ये विपश्यना करत असताना देशात २०व्या क्रमांकाने यूपीएससी उत्तीर्ण झाल्याचा फोन आला. तो क्षण आयुष्यातील अविस्मरणीय क्षण होता,' असे त्यांनी सांगितले.




वारंवार होणाऱ्या बदल्यांबाबत बोलताना मुंढे म्हणाले, 'बदली हा माझ्यासाठी त्रासाचा विषय नाही. बदल हा प्रगतीचा अविभाज्य भाग आहे. जितक्या अधिक बदल्या होतील, तितके अधिक सकारात्मक बदल घडविण्याची संधी मिळते.' अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईबाबत त्यांनी भेसळयुक्त अन्न आणि निकृष्ट खाद्यपदार्थांविरोधात कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले. नागरिकांनीही अन्नाची गुणवत्ता आणि नियमांबाबत सजग राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

डिजिटल युगातील तरुणाईला मार्गदर्शन करताना ते म्हणाले, 'सोशल मीडियावर केवळ रील्स स्क्रोल करू नका, विचार करा. कष्ट करण्याची तयारी ठेवा आणि स्वतःची वेगळी ओळख निर्माण करा. परिस्थिती कशीही असली तरी भविष्य हे आज घेतलेल्या निर्णयांवर अवलंबून असते.'

दरम्यान, १९९६ मध्ये यूपीएससीच्या तयारीसाठी दिल्लीला गेल्यानंतरचा अनुभव, तसेच शाळेत असताना शिक्षकाच्या बदलीसाठी केलेल्या अर्जाचा किस्साही त्यांनी सांगितला. 'व्यक्तीपेक्षा व्यवस्था महत्त्वाची आहे. अधिकारी येतील-जातील; मात्र व्यवस्था सुरळीत चालण्यासाठी उत्तरदायित्व आणि कार्यपद्धतीची संस्कृती विकसित झाली पाहिजे,' असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात अरविंद जगताप यांनी मुंढे यांच्या प्रशासकीय प्रवासावर लिहिलेल्या पत्राचे वाचन केले. मिलिंद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. विरेश आंधळकर यांनी प्रास्ताविक व आभार मानले.

## मुळा–मुठा नदीपात्रात नवजात मुलीचा मृतदेह

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वाघोली :** खराडी परिसरालगत मुळा–मुठा नदीपात्रातील झुडपांमध्ये अवघ्या एक दिवसाच्या नवजात मुलीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. बाळाला नदीपात्रात कोणी आणून टाकले, तसेच या घटनेमागील नेमके कारण काय, याचा तपास वाघोली पोलिसांकडून सुरू आहे.

मुळा–मुठा नदीपात्रातील झुडपांमध्ये नवजात मुलीचा मृतदेह अडकलेला काही नागरिकांच्या निदर्शनास आला. त्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच वाघोली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला.

पुढील वैद्यकीय तपासणीसाठी मृतदेह पाठविण्यात आला आहे.

प्राथमिक माहितीनुसार, या मुलीचा जन्म होऊन अंदाजे एक दिवस झाला असावा. बाळाचा जन्म कुठे झाला, त्यानंतर ते नदीपात्रात कोणी आणून टाकले आणि या प्रकरणात अन्य कोणाचा सहभाग आहे का, याचा पोलिसांकडून शोध घेतला जात आहे. घटनेच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी नदीपात्रालगत तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. तसेच स्थानिक नागरिकांकडूनही माहिती घेतली जात आहे. नवजात मुलीला नदीपात्रात आणून सोडणाऱ्या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून विविध शक्यता तपासल्या जात आहेत.

## मुला–मुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण घेण्याची संधी

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** राज्यशासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातील मुला–मुलींच्या उच्च शिक्षणासाठी राबविण्यात येणाऱ्या 'परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती' योजनेसाठी इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन घोडेगावचे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी गणेश इवनाते यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत सन २०२६–२७ या शैक्षणिक वर्षासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या ४० गुणवंत



विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार आहे. शिष्यवृत्तीमध्ये शिक्षण व परीक्षा शुल्क, निर्वाह भत्ता (निवास व भोजन), शैक्षणिक आकस्मिक, इतर खर्च, विमान प्रवास खर्च, व्हिसा शुल्क आणि आरोग्य विमाचा समावेश असणार आहे. शैक्षणिक आकस्मिक, इतर खर्च युएएस व इतर देशांसाठी (युके वगळून) १ हजार ५०० युएस डॉलर तर युकेसाठी १ हजार १०० जीबीपी इतका दरवर्षी देण्यात येईल. शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित नमुन्यातील आवेदन https://fs.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर भरणे अनिवार्य आहे. अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जाणार आहेत. निकष पूर्ण करणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांची निवड समितीद्वारे निवड केली जाणार आहे. योजनेबाबत अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन आदिवासी विकास विभागाने केले.

**योजनचे पात्रता निकष:**

विद्यार्थी अनुसूचित जमाती प्रवर्गातील आणि महाराष्ट्राचा रहिवासी असावा.पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी ३५ वर्षे तर पीएचडी अभ्यासक्रमासाठी ४० वर्षे वयोमर्यादा निश्चित करण्यात आली. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपर्यंत असावे. टोफेल (टीओईएफएल), आयईएलटीएस किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असणे. तसेच विद्यापीठांची क्युस वर्ल्ड रँकिंग मर्यादा २०० च्या आत असणे बंधनकारक आहे. विहित निकषानुसार विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास लाभार्थी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची उत्पन्न मर्यादा १० लाख रुपयांपर्यंत शिथिल करण्यात येणार आहे. तर क्युस वर्ल्ड रँकिंग मर्यादा २०० पासून पुढे चढत्या क्रमाने ३०० पर्यंत ग्राह्य धरण्यात येईल.

■ राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात पीएचडी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी दरवर्षी शिष्यवृत्ती दिली जाते. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या परदेशातील उच्च शिक्षण घेण्याच्या स्वप्नांना बळ मिळते. इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांनी तत्काळ ऑनलाईन अर्ज करावेत.ख्र

**–लीना बनसोड,**
आयुक्त, आदिवासी विकास विभाग

# एमडी तस्करीप्रकरणी फरार आरोपी ताब्यात

## स्थानिक गुन्हे शाखेची गुप्त कारवाई; बिष्णोई गँगशी संबंध असल्याचा संशय

**दादा सोनवणे : । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यात अमली पदार्थांची तस्करी होत असल्याच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरू ठेवला आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एनडीपीएस गुन्ह्यातील फरार आरोपीला अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने श्रीगोंदा तालुक्यातील ढवळगाव येथून ताब्यात घेतले. नाना तांबे असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव असून, तो कथितरित्या बिष्णोई गँगशी संबंधित असल्याची माहिती पोलिसांच्या तपासातून समोर येत आहे. या कारवाईमुळे अमली पदार्थ तस्करीच्या मोठ्या साखळीचा छडा लागण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

२४ जुलै २०२६ रोजी एमआयडीसी पोलिसांनी धनंबळक बायपास परिसरात कारवाई करत राजस्थानातील मूळ रहिवासी आणि सध्या करमाळा येथे राहणाऱ्या रविप्रकाश भेराराम बिश्रोई (वय २९) याला ताब्यात घेतले होते. त्याच्याकडून २५.४९ ग्रॅम एमडी, तीन पुड्यांमध्ये ३.६९ ग्रॅम तपकिरी रंगाचा पदार्थ, मोबाइल तसेच विनानंबरची स्विफ्ट कार असा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे ११ लाख ४३ हजार २०० रुपये असल्याचे एफआयआरमध्ये नमूद आहे.

पोलिसांच्या पथकाला दोन वाहनांमध्ये काही व्यक्ती संशयास्पदरीत्या आढळून आल्या होत्या. पोलिसांची चाहूल लागताच दोन जण ब्रेझा कारमधून पसार झाले. घटनास्थळी आढळलेल्या व्यक्तीची चौकशी करून वाहनाची झडती घेतल्यानंतर एमडीचा साठा आढळून आला. विक्रीच्या उद्देशाने एमडी



आणल्याचे तपासात निष्पन्न झाल्यानंतर एनडीपीएस कायदा १९८५ मधील कलम ८(क) व २२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणातील फरार आरोपी श्रीगोंदा तालुक्यातील ढवळगाव येथील असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. त्यानंतर पथकाने गुप्तपणे माहिती संकलित करून आरोपीचा ठावठिकाणा शोधला. आरोपी ढवळगाव येथे असल्याची खात्री झाल्यानंतर पथकाने रात्री अचानक कारवाई करत नाना तांबे याला ताब्यात घेतले.

या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप दरवडे, प्रताप देवकाते, पोलीस हेडकॉन्स्टेबल मनोज साखरे, बाळासाहेब गुंजाळ, रोहित मिसाळ, प्रशांत राठोड आदींचा सहभाग होता.

**तस्करीच्या साखळीपर्यंत पोहोचणार?**

एमडीसारखा घातक अमली पदार्थ कुठून आला, तो कोणाला पुरवला जाणार होता आणि या व्यवहारामागे आणखी कोणाचे धागेदोरे आहेत, याचा तपास आता महत्त्वाचा ठरणार आहे. फरार आरोपी ताब्यात आल्याने या तस्करीच्या नेटवर्कमधील आणखी चेहरे पोलिसांच्या हाती लागण्याची शक्यता असून, तपासात काय निष्पन्न होते याकडे लक्ष लागले आहे.

द•ख•ल

# ऑलिम्पियाड परीक्षेत मनस्वी साखरे राज्यात प्रथम

**श्रीगोंदा ।** शैक्षणिक गुणवत्तेच्या क्षेत्रात श्रीगोंद्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. शिवाजीराव नागवडे डिफिडेल्स स्कूलची इयत्ता दुसरीतील विद्यार्थिनी कु. मनस्वी मनोज साखरे हिने 'उत्कृष्ट ऑलिम्पियाड परीक्षा २०२५-२६' मध्ये २०० पैकी तब्बल १९८ गुण मिळवत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला. मनस्वीने यापूर्वी मंथन तसेच उत्कृष्ट ऑलिम्पियाड परीक्षेत राज्यात द्वितीय क्रमांक मिळवत गुणवत्तेची छाप उमटवली होती. यावेळी तिने अव्वल स्थान मिळवत आपल्या यशात आणखी भर घातली. तिच्या यशामागे पालकांचे प्रोत्साहन, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि तिची मेहनत यांचा मोलाचा वाटा आहे. दरम्यान, याच परीक्षेत शंभूराजे प्रवीण जामदार यांनी १९८ गुणांसह राज्यात प्रथम, ओवी अमोल नागवडे हिने १९२ गुणांसह प्रथम, स्वरूप गोरख कोथिंबिरे याने १९४ गुणांसह तृतीय, तर प्रसन्ना सूर्यभान गोलांडे हिने १८८ गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. ज्ञानेश्वरी राहुल जामदार व कुशनप्रकाश जनार्धन कान्हेरकर यांनीही अनुक्रमे चौथा व पाचवा क्रमांक मिळवला. या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# शैक्षणिक क्षेत्रात राशीनचा डंका प्राचार्य राजेंद्र नष्टे यांना 'सह्याद्री रत्न'

**राशीन :** शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेले हशु आडवाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र नारायण नष्टे यांना प्रतिष्ठेचा 'सह्याद्री रत्न – आदर्श प्राचार्य' पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुणे येथील पत्रकार भवनात आयोजित विशेष पुरस्कार सोहळ्यात सिनेअभिनेते सुनील गोडबोले यांच्या हस्ते प्राचार्य नष्टे यांचा सन्मान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान, शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी केलेले




प्रयत्न आणि विद्यार्थीहिताला दिलेले प्राधान्य याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. प्राचार्य नष्टे यांनी विद्यालयातील शैक्षणिक वातावरण अधिक सक्षम करण्यासोबतच विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संस्कार, आत्मविश्वास, गुणवत्ता आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविले. त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यालयाने शैक्षणिक तसेच सहशालेय उपक्रमांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यामुळे हा पुरस्कार त्यांच्या कार्याची पावती मानली जात आहे. या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन राष्ट्रवादी चित्रपट व सांस्कृतिक विभागाचे अध्यक्ष नितीन धवणे-पाटील व संस्थापक अध्यक्ष डॉ. दीपक जाधव यांच्या पुढाकाराने करण्यात आले.

# नान्नज बंदला ग्रामस्थ, व्यापाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**जामखेड :** नान्नज येथील विविध प्रलंबित नागरी प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी उपोषणास बसलेल्या शहाजी राजेभोसले यांना पाठिंबा देण्यासाठी ग्रामस्थ व व्यापाऱ्यांनी गाव कडकडीत बंद ठेवत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी गावातील व्यापाऱ्यांनी शंभर टक्के दुकाने बंद ठेवून उपोषणस्थळी उपस्थित राहत जाहीर पाठिंबा दिला. नान्नज येथील बसस्थानक, पिण्याचे पाणी, रस्ते तसेच बँकेच्या सुविधेचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. सुसज्ज बसस्थानकात पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, तसेच शेतकरी, व्यापारी, ज्येष्ठ नागरिक व तरुणांच्या सोयीसाठी स्टेट बँक ऑफ इंडिया किंवा बँक ऑफ महाराष्ट्रची शाखा सुरू करावी, अशी मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे. गाव बंददरम्यान वैद्यकीय सेवा, औषध दुकाने, दूध विक्री यांसारख्या अत्यावश्यक सेवा सुरू ठेवण्यात आल्या. उपोषणकर्ते भोसले यांची नान्नज प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी बनसोडे यांनी तपासणी केली. दरम्यान, प्रशासनाने मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास जामखेड-करमाळा मार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थ व व्यापाऱ्यांनी दिला. बंदच्या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित मोरे यांच्यासह पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला. बंद शांततेत पार पडला.




# पिंपळनेर, जवळा वडगाव गुंड, म्हसे गावातील पुलांसाठी निधी मंजूर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** कुकडी डावा कालवा अंतर्गत येणाऱ्या पिंपळनेर येथील कॅनॉलवरील पुलासह तालुक्यातील जवळा, वडगाव गुंड, म्हसे अशा एकूण चार पुलांसाठी राज्याच्या निधीतून मंजुरी मिळाली आहे. या महत्त्वपूर्ण विकासकामासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे सुजित झावरे पाटील यांच्या प्रयत्नांना मोठे यश आले असून, याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांचा नुकताच विशेष सत्कार करण्यात आला.



पालकमंत्र्यांकडे केली होती आग्रही मागणी परिसरातील नागरिकांची आणि शेतकऱ्यांची दळणवळणाची गैरसोय टाळण्यासाठी कुकडी डाव्या कालव्यावरील पुलांची अत्यंत आवश्यकता होती. या अनुषंगाने सुजित झावरे पाटील यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. राधाकृष्णजी विखे पाटील यांच्याकडे या चारही पुलांच्या निर्मितीसाठी निधीची आग्रही मागणी केली होती. त्यांच्या या मागणीची तातडीने दखल घेत, पालकमंत्री विखे पाटील यांनी या पुलांच्या कामासाठी भरीव निधी मंजूर केला आहे. यामुळे पिंपळनेरसह परिसरातील दळणवळणाचा मोठा प्रश्न मार्गी लागला आहे.मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान या पुलांसाठी निधी मंजूर करून आणल्याबद्दल सुजित झावरे पाटील यांच्या कार्याचे कौतुक करण्यासाठी एका सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्षा अश्विनीताई थोरात यांच्या हस्ते सुजित झावरे पाटील यांचा यथोचित सत्कार करून सन्मान करण्यात आला. या आनंददायी प्रसंगी सुनील भापकर, भाऊसाहेब शिर्के, संपतराव सावंत, चांगदेव शिर्के, राजू शिर्के यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर मंडळी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या रखडलेल्या विकासकामाला निधी मिळाल्यामुळे परिसरातील नागरिकांमधून मोठे समाधान व्यक्त केले जात आहे.

# हरिनामाच्या गजरात कर्जतचा गोदड महाराज रथोत्सव उत्साहात

## हजारो भाविकांनी ओढला तीन मजली रथ

**मनोरंजन नगरीत गर्दी**

रथोत्सवानिमित्त बसस्थानक परिसर, ईदगाह मैदान आणि दादा पाटील महाविद्यालयासमोरील प्रांगणात मनोरंजन नगरी उभारण्यात आली आहे. रहाट पाळणे, जादूचे खेळ, मौत का कुआ, विविध दुकाने व खाद्यपदार्थांचे स्टॉल यामुळे परिसर गजबजला आहे. दोन दिवसांत येथे कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असल्याचे सांगण्यात येते. सोमवारी कुस्त्यांचा हगामा होऊन यात्रेची सांगता होणार आहे.

**चोख पोलीस बंदोबस्त; वाहतूक सुरळीत**

रथोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवत वाहतूक नियोजन केले. वाहतूक पोलीस कर्मचारी राजेंद्र थोरात व सहकाऱ्यांनी पर्यायी मार्गाने वाहतूक वळवून कोंडी टाळली. पोलीस उपअधीक्षक सुजित क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड यांनी बंदोबस्ताची जबाबदारी सांभाळली.

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

कर्जत । कर्जतचे ग्रामदैवत संत सद्गुरू गोदड महाराजांचा रथोत्सव रविवारी (दि. ९) हजारो भाविकांच्या उपस्थितीत भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला. 'संत सद्गुरू गोदड महाराज की जय' आणि हरिनामाच्या गजरात भाविकांनी तीन मजली रथ ग्रामप्रदक्षिणेसाठी ओढला. पहाटेपासूनच मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

शनिवार मध्यरात्रीपासून मंदिरात महाराजांच्या मूर्तीचा अभिषेक सुरू होता. सकाळी पंचक्रोशीतील मानाच्या दिंड्या हरिनामाचा गजर करीत कर्जतमध्ये दाखल झाल्या. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी अभिषेक करून महाराजांचे दर्शन घेतले.



सकाळी ९ वाजता पोलीस उपअधीक्षक सुजित क्षीरसागर, पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड यांच्यासह पोलीस प्रशासनाच्या उपस्थितीत मंदिरावर मानाचा भगवा ध्वज चढविण्यात आला.

दुपारी तहसीलदार रवी सतवन यांच्या हस्ते शासकीय पूजा पार पडली. त्यानंतर रथामध्ये संत गोदड महाराजांची मूर्ती स्थापन करण्यात आली. हजारो भाविकांनी दोरीच्या साहाय्याने रथ ओढत ग्रामप्रदक्षिणा पूर्ण केली. रथाच्या मार्गावर ठिकठिकाणी पुष्पहार, नारळाचे तोरण अर्पण करण्यात आले. चालत्या रथाला दिशा देण्याची जबाबदारी मानकरी जीव धोक्यात घालून पार पाडत होते. संध्याकाळी रथ मंदिरात परतल्यानंतर आरती करण्यात आली.

# नौदलातून देशसेवा; आता मंत्रालयातून महाराष्ट्रसेवा

## श्रीगोंद्याच्या दोन सुपुत्रांची थक्क करणारी झेप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा ।** भारतीय नौदलात एकत्र प्रवेश करून तब्बल १५ वर्षे देशसेवा करणारे श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी कोठारचे संभाजी बबनराव जाधव आणि चोराचीवाडीचे अर्जुन लांडगे यांनी आता महाराष्ट्राच्या प्रशासकीय केंद्रस्थानी मंत्रालयातही आपला ठसा उमटविला आहे. संभाजी जाधव यांची महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री कार्यालयात पदोन्नतीने नियुक्ती झाल्याने तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

बेलवंडी कोठार येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतून संभाजी जाधव यांच्या शिक्षणाला सुरुवात झाली. पुढे श्रीगोंदा येथील रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतानाच जुलै १९९१ मध्ये त्यांनी भारतीय नौदलात प्रवेश केला. सैनिकी सेवेत असतानाच त्यांनी पदवीचे शिक्षण पूर्ण केले. १५ वर्षांची सेवा पूर्ण करून जुलै २००६ मध्ये ते नौदलातून बाहेर पडले.

त्यानंतर नागरी सेवेत जाण्याचे ध्येय ठेवून त्यांनी अथक परिश्रम केले. नोव्हेंबर २००८ मध्ये मंत्रालयात सहायक कक्ष अधिकारी म्हणून प्रवेश केल्यानंतर कार्यकुशलता व अनुभवाच्या जोरावर त्यांनी अवर सचिव (वर्ग-१) पदापर्यंत मजल मारली. आता उपमुख्यमंत्री कार्यालयात पदोन्नतीने नियुक्ती झाल्याने त्यांच्या यशाला नवे शिखर लाभले आहे.

चोराचीवाडीचे अर्जुन लांडगे हेही नौदलातील त्यांचे सहकारी असून, दोघांचा सहप्रवास आज मंत्रालयातही कायम आहे. या यशाबद्दल श्रीगोंदा तालुक्यात विविध ठिकाणी जाधव यांचा नागरी सत्कार करण्यात येत आहे. आमदार विक्रम पाचपुते यांनीही त्यांचा विशेष सन्मान करून शुभेच्छा दिल्या. बेलवंडी कोठार येथे ॲड. दत्तात्रय झराड यांच्या अध्यक्षतेखाली नागरी सत्कार सोहळा पार पडला.

दोन्ही सुपुत्रांच्या यशाने श्रीगोंदा तालुक्याचा गौरव वाढला आहे.

# तीनशे वर्षांपूर्वी जोपासले हिंदू-मुस्लिम ऐक्य

## राशीनच्या वैभवात शेटे स्वामी घराण्याचे अमूल्य योगदान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राशीन ।** राशीनच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक वैभवाला भक्कम पाया घालणारे थोर कर्मयोगी सत्पुरुष श्रीमंत स्वामी आकाप्पा शेटे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आषाढ वद्य एकादशीला संजीवन समाधी सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला. यानिमित्त संजीवन समाधी मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सुमारे तीनशे वर्षांपूर्वी शेटे स्वामी घराण्याने स्वतःच्या आर्थिक योगदानातून श्री जगदंबा देवी, श्री काशी विश्वेश्वर, श्री विष्णू, श्री वीरभद्र आणि श्री गणेश मंदिरांसह अनेक हेमाडपंथी मंदिरांची उभारणी केली. मंदिर परिसरात दगडी ओवऱ्या तसेच नागरिकांच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी मोठी बारव बांधण्यात आली. विविध पेठांची निर्मिती करून राशीनच्या आर्थिक आणि सामाजिक विकासालाही त्यांनी चालना दिली.

शेटे स्वामी घराण्याच्या कार्याचा महत्त्वाचा पैलू म्हणजे त्या काळातही त्यांनी सर्वधर्मसमभाव आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याची परंपरा जोपासली. राशीनच्या यात्रा-उत्सवांमध्ये मुस्लिम समाजातील व्यक्तींनाही सहभागी करून घेण्यात आले. तीनशे वर्षांपूर्वीचा सामाजिक सलोख्याचा हा वारसा आजही प्रेरणादायी ठरत आहे.

संजीवन समाधीस्थळी स्वामींचे वंशज राशिंकर शेटे यांच्या वतीने अभिषेक करण्यात आला. त्यानंतर भजन व दुपारी ग्रामस्थांच्या उपस्थितीत महाआरती झाली. शेकडो भाविकांनी दर्शन घेत महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी शेटे स्वामी घराण्याच्या समाजसेवा, सर्वधर्मसमभाव आणि कर्मयोगी परंपरेचे स्मरण करून अभिवादन करण्यात आले.

# बेपत्ता युवकाच्या तपासासाठी बोलावलेल्या तरुणाला मारहाण

## ५० हून अधिक ग्रामस्थ विरगाव पोलिस ठाण्यात दाखल, चौकशीची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** गुन्ह्याचा तपास करण्यासाठी पोलिसांना कायद्याने अधिकार दिले आहेत. मात्र, या अधिकारांचा वापर नागरिकांना न्याय देण्यासाठी होतोय की दहशत निर्माण करण्यासाठी, असा गंभीर सवाल विरगाव पोलिस ठाण्यातील कथित मारहाणीच्या घटनेनंतर उपस्थित झाला आहे. बेपत्ता युवकाच्या तपासासाठी पोलिस ठाण्यात बोलावलेल्या २६ वर्षीय नारायण वैजिनाथ गिधाने या तरुणाला पोलिस अधिकाऱ्याने बेल्ट व काठीने मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे माळीसागज गावात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, रविवारी सकाळी ५० हून अधिक ग्रामस्थ नारायणसोबत विरगाव पोलिस ठाण्यात दाखल झाले.

माळीसागज येथील नारायण गिधाने याला शनिवार, ८ ऑगस्ट रोजी बेपत्ता युवकाच्या प्रकरणाच्या चौकशीसाठी विरगाव पोलिस ठाण्यातील पोलिस उपनिरीक्षक माने यांनी फोन करून बोलावल्याचे सांगण्यात आले. सुमारे आठवडाभरापूर्वी गावातील एक तरुणी व तरुण बेपत्ता झाल्याची तक्रार पोलिस ठाण्यात दाखल झाली होती. त्याच प्रकरणाच्या तपासासाठी नारायणला बोलावण्यात आले होते. तो पोलिस ठाण्यात हजर झाला नाही तर पोलिस वाहन पाठवून त्याला आणण्यात येईल, असे सांगण्यात आल्याचा आरोप आहे.

नारायण पोलिस ठाण्यात हजर झाल्यानंतर त्याला सुमारे दोन तास बसवून ठेवण्यात आले. त्यानंतर बेपत्ता युवकाबाबत त्याची चौकशी करण्यात आली. बेपत्ता युवकाला ५० हजार रुपये देण्याबाबतही त्याला



विचारण्यात आल्याचे नारायणने सांगितले. मात्र, या प्रकरणाशी आपला कोणताही संबंध नसून बेपत्ता युवकासोबत आपला संपर्क झालेला नसल्याचे त्याने स्पष्ट केले.

यानंतर संबंधित पोलिस अधिकारी संतापले आणि युवक सापडेपर्यंत तुरुंगात टाकण्याची धमकी दिल्याचा आरोप नारायणने केला आहे. त्यानंतर त्याला पोलिस ठाण्यातील मागील खोलीत नेण्यात आले. तेथे शिवीगाळ करण्यात आली. शिवीगाळ करू नका, अशी विनंती केल्यानंतर आपल्याला मारहाण सुरू करण्यात आल्याचा दावा त्याने केला.

पोलिसांनी कपडे काढण्यास सांगून मान पकडून खाली बसविले आणि त्यानंतर बेल्ट व काठीने मारहाण केल्याचा आरोप नारायणने केला आहे. आपण केलेला गुन्हा काय, असा प्रश्न विचारूनही आपले म्हणणे ऐकून घेण्यात आले नाही, असे त्याने सांगितले. रात्री सुमारे आठ वाजता त्याला घरी जाण्यास सांगण्यात आले.

पोलिस ठाण्यातून बाहेर पडल्यानंतर अंगात तीव्र वेदना जाणवू लागल्याने नारायणने वैजापूर उपजिल्हा रुग्णालयात उपचार घेतले. वैद्यकीय प्रक्रियेदरम्यान विरगाव पोलिस ठाण्यात मारहाण झाल्याची माहिती नोंदविण्यात आली असून, वैजापूर पोलिस ठाण्यात एमएलसी पाठविण्यात आल्याचे सांगण्यात आले. उपचारानंतर तक्रार दाखल करण्यासाठी नारायण वैजापूर पोलिस ठाण्यात गेला असता संबंधित एमएलसी विरगाव पोलिस ठाण्याकडे वर्ग करण्यात आल्याचे त्याला सांगण्यात आले.

दरम्यान, रविवारी सकाळी माळीसागज येथील ५० हून अधिक ग्रामस्थ नारायणसोबत विरगाव पोलिस ठाण्यात पोहोचले. नारायणने लेखी तक्रार देऊन मारहाण करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी केली. तपासाच्या नावाखाली मारहाण, शिवीगाळ किंवा धमकी देणे योग्य आहे का, असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला असून, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

> दाखल झालेल्या प्रकरणाच्या तपासासाठी नारायणला बोलावण्यात आले होते. मारहाण झाल्याची तक्रार घेऊन नारायणच्या घरातील व्यक्ती पोलिस ठाण्यात आल्या आहेत. या प्रकरणाची माहिती घेत असून नेमके काय घडले, याची चौकशी केली जात आहे, अशी प्रतिक्रिया विरगाव पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक प्रदीप भिवसेन यांनी दिली.

# दीडशे कोटी खर्चूनही गावे तहानलेलीच मिरी-तिसगावचे १३ गावांना पाणी नाही

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**करंजी :** दीडशे कोटी रुपये खर्चाच्या मिरी-तिसगाव प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेचे कार्यारंभ आदेश २०२२ मध्ये झाले.दोन वर्षांत काम पूर्ण करणे बंधनकारक असताना मुदत संपून आणखी दोन वर्षे उलटली,तरीही योजनेचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही.त्यामुळे कोट्यवधी रुपये खर्चूनही या योजनेतील अनेक गावे अद्याप तहानलेलीच आहेत.

या योजनेबाबत सविस्तर असे कि या योजनेअंतर्गत ४२ गावांमध्ये जुन्या व नव्या मिळून ६७ पाण्याच्या टाक्या आहेत. त्यापैकी आतापर्यंत केवळ २९ गावांतील पाण्याच्या टाक्यांपर्यंत पाणी पोहोचले आहे.उर्वरित १३ गावांना अद्याप पाणी मिळालेले नाही.त्यामुळे योजना पूर्ण होऊन सर्व गावांना पूर्ण दाबाने नियमित पाणी कधी मिळणार,असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

गेल्या वर्षी मार्चमध्ये केंद्रीय पथकाने योजनेची पाहणी केली होती. त्या वेळी संबंधित एजन्सीच्या कामात गंभीर त्रुटी आढळून आल्या होत्या.या त्रुटी सहा महिन्यांत दूर करण्याचे लेखी आश्वासन संबंधित एजन्सीने दिले होते.मात्र,अद्यापही त्याची पूर्ण अंमलबजावणी झालेली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.



योजनेच्या कामात दिरंगाई,अंदाजपत्रकानुसार काम न करणे तसेच कामाच्या नोंदी व प्रत्यक्ष कामात तफावत असल्याच्याकारणांवरूनयोजनेशी संबंधित सात अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली.मात्र,ज्या एजन्सीच्या कामामुळे या त्रुटी निर्माण झाल्या,त्या एजन्सीवर अद्याप ठोस कारवाई किंवा दंड करण्यात आलेला नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

**अधिकारी निलंबित,कंपनी मात्र मोकाट**

सर्वसामान्य जनता पाण्यासाठी फडफडत आहे.अधिकारी निलंबित झाले असले तरी संबंधित कंपनी मात्र मोकाट आहे.या प्रकरणी लवकरच महाराष्ट्राचे पाणीपुरवठा मंत्री यांची भेट घेऊन या भागातील सरपंचांसह शिष्टमंडळाच्या माध्यमातून तक्रार करणार आहोत.' संभाजी पालवे,माजी सभापती,पाथर्डी

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

सोमवार दि.१० ऑगस्ट २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

## राहुरीत गोमांस विक्रीवर पोलिसांची कारवाई; दोघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी फॅक्टरी परिसरातील कराळेवाडी येथे गोमांस विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी पोलिसांना माहिती दिली. या माहितीच्या आधारे राहुरी पोलिसांनी तत्काळ कारवाई करत दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. या कारवाईत २० किलो गोमांस, दोन वजनकाटे, लोखंडी सुरी, कानस तसेच गोमांस तोडण्यासाठी वापरण्यात येणारी लोखंडी हत्यारे असा एकूण ६ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी युसुफ इब्राहिम कुरेशी (वय ५०) आणि फिरोज इब्राहिम शेख (वय ४०), दोघे रा. कराळेवाडी, राहुरी यांच्याविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ८ ऑगस्ट रोजी दुपारी गोमांस विक्री होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कॉन्स्टेबल बाबासाहेब शेळके यांनी पंचांसह घटनास्थळी जाऊन कारवाई केली. घटनास्थळावरून गोमांस व संबंधित साहित्य जप्त करण्यात आले. याप्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल अमोल परशुराम भांड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास राहुरी पोलिस करीत आहेत.

## कुकडी प्रकल्पासाठी अतिरिक्त पाणी

### दुष्काळ भूतकाळात जमा करु : ना. विखे पाटील



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर** : कुकडी प्रकल्पातील पाण्याची तूट भरून काढायची असेल अतिरीक्त पाणी निर्माण करावे लागणार आहे.महायुती सरकार त्यादृष्टीने प्रयत्न करीत असून, राज्यामध्ये दुष्काळ आता भूतकाळ ,होईल असा विश्वास जलसंपदा तथा पालक मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला. कुकडी लाभक्षेत्रातील डाव्या कालव्याच्या नूतनीकरणाचा शुभारंभ मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत जवळा येथे करण्यात आले.

आ.काशिनाथ दाते यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी आणि जलसंपदा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.तालुक्यातील गांजी भोयरे येथे रस्ते विकासाचे लोकार्पण करण्यात आले. आपल्या भाषणात मंत्री विखे म्हणाले की, पारनेर तालूका दुष्काळमुक्त करण्याचे काम जलसंपदा विभागाच्या माध्यमातून सुरू झाले आहे.यापुर्वी सहा उपसा सिंचन योजनांना मंजूरी दिली असून पाण्याची उपलब्धता होईल त्या पध्दतीने सर्व उपसा सिंचन योजना कार्यान्वित करून लाभक्षेत्रातील गावांना लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमाच्या माध्यमातून कालव्यांच्या नूतनीकरणाची मोहीम हाती घेतल्यामुळे कालव्याचे संरक्षणा बरोबरच पाण्याची गळती थांबवून वहन क्षमता वाढविण्याचे प्रयत्न असल्याचे स्पष्ट करून मंत्री विखे पाटील म्हणाले की,धरणातील पाण्याची साठवण क्षमता वाढवावी लागणार आहे.अतिरिक्त पाणी निर्माण करणे हेच सरकारचे उद्दिष्ट आहे.

महायुती सरकारने ३६ लाख रुपयांची कर्जमाफी आणि वीजबील माफीचा निर्णय सुध्दा नवी संधी निर्माण करून देणारा आहे.पारनेर तालुक्यात ३२००शेतकर्यांना २४कोटी रुपये मंजूर झाले असल्याचे त्यांनी सांगितले. पारनेर सहकारी साखर कारखाना शेतकऱ्यांच्या मालकीचा राहीला पाहीजे ही भूमिका तालुक्यातील शेतकर्यांनी यापुर्वीच घ्यायला पाहीजे होती असे मत मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केले.

## पांडुरंग महोत्सवासाठी शेकडो दिंड्या ताहाराबादमध्ये दाखल

### 'प्रतिपंढरी' लाखो भाविकांनी गजबजली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील 'प्रतिपंढरी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र ताहाराबाद येथे पांडुरंग महोत्सवाला भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला आहे. कामिका एकादशीच्या पर्वणीवर रविवारी राज्याच्या विविध भागांतून शेकडो पायी दिंड्या व पालख्यांचे ताहाराबादमध्ये आगमन झाले. संत कवी महिपती महाराज समाधी मंदिर परिसरात लाखो भाविकांची मांदियाळी पाहायला मिळत असून संपूर्ण पंचक्रोशी भक्तिरसात न्हाऊन निघाली आहे. सालाबादप्रमाणे पंढरपूर निवासी पांडुरंगाचे श्री संत कवी महिपती महाराजांच्या भेटीसाठी ताहाराबाद येथे आगमन झाले आहे.

आषाढ वद्य नवमीला होणाऱ्या या आगमनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महाभिषेक, काकड आरती, नैवेद्य, हरिपाठ, भिक्षा कार्यक्रम तसेच दिंड्यांचे स्वागत आदी कार्यक्रम सुरू आहेत. सोमवारी (१० ऑगस्ट) सकाळी रामदास महाराज क्षीरसागर यांची, तर रात्री ८ वाजता आदिनाथ महाराज शास्त्री यांची कीर्तनसेवा होणार आहे. मंगळवारी बाळकृष्ण महाराज कांबळे यांचे काल्याचे कीर्तन, तसेच देवस्थानचे मठाधिपती अर्जुन महाराज तनपुरे यांच्या कीर्तनानंतर दहीहंडीचा सोहळा होणार आहे. बुधवारी छबीना मिरवणूक, पूजा, आरती व शिळा गोपाळकाला होईल. गुरुवारी (१३ ऑगस्ट) पहाटे ५ वाजता पाऊलघडीच्या कार्यक्रमाने महोत्सवाची सांगता होणार आहे.




महोत्सवात सात दिवस अखंड चहा, नाश्ता व अन्नदान सुरू असते. पाणीटंचाईची परिस्थिती असतानाही देवस्थान व स्थानिक भाविकांच्या सहकार्याने लाखो भाविकांची व्यवस्था केली जाते. दरवर्षी सुमारे ७ ते ८ लाख भाविक या महोत्सवात सहभागी होत असल्याने ताहाराबाद परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त होते. महोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन देवस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

## बिबट्याचा शेळीवर हल्ला...

### शेतकऱ्याच्या प्रसंगावधानाने शेळी बचावली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**टाकळीभान** : टाकळीभान शिवारात बिबट्याने अचानक शेळीवर झडप घालून शेळीस जखमी केले आहे. त्यामुळे टाकळीभान परिसरामध्ये बिबट्याचे हल्ले सुरू असून परिसरात बिबट्याने अनेक शेळ्या, पाळीव प्राणी व कुत्रे फस्त केले असून तरी वन विभाग झोपेचे सोंग घेताना दिसत आहे. सविस्तर वृत्त असे की श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील शेतकरी नंदू दगडू रणनवरे हे गट नंबर ४५१ येथे वस्ती करून १६ चारी लगत राहत असून काल दुपारच्या दोन अडीचच्या दरम्यान सदर शेतकरी आपल्या स्वतःच्या शेळ्या रानात चारीत होता त्या ठिकाणी बिबट्याने शेळीवर अचानक झडप घालून तिला जखमी केले शेतकरी रणनवरे यांनी प्रसंगावधान साधून बिबट्याच्या तावडीतून शेळीची सुटका केली. या अगोदरही शिवारात बिबट्याने अनेक शेळ्यांचा व कुत्र्यांचा फडशा पडला आहे. या बिबट्याच्या वावरामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. तरी वन विभागाने बिबट्याचा बंदोबस्त त्वरित करावा अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

## बस थांबवण्याच्या कारणावरून वाद एसटी वाहकाला तिघांकडून मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : बस थांबवण्याच्या किरकोळ कारणावरून वाद घालत प्रवाशासह तिघांनी बस स्थानकात शिरून एसटी वाहकाला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना शनिवारी (दि. ८) दुपारी वैजापूर बस स्थानकात घडली. या प्रकरणी शासकीय कामात अडथळा आणणे, मारहाण करणे व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी बाबासाहेब बळीराम पगारे (रा. शिवूर, ता. वैजापूर) व त्याच्या तीन अनोळखी साथीदारांविरुद्ध पोलिसांकडून कारवाई सुरू आहे. विशाल रघुनाथ मोरे (वय २८, रा. रस्ते सुरेगाव, ता. येवला) हे वैजापूर आगारात वाहक म्हणून कार्यरत आहेत.

शनिवारी चालक समाधान सूर्यभान पठारे यांच्यासोबत बस क्रमांक एमएच १४ एनई ६५९८ वर कन्नड-वैजापूर मार्गावर त्यांची ड्युटी होती. दुपारी सव्वादोनच्या सुमारास बस लक्ष्मी टॉकीजजवळ थांबली. मात्र, कोणत्याही प्रवाशाने उतरण्याचा इशारा न दिल्याने बस पुढे निघाली. यानंतर एका प्रवाशाने 'मला लक्ष्मी टॉकीजजवळ उतरायचे होते' असे म्हणत वाहक मोरे यांच्याशी वाद घातला. तसेच बस स्थानकावर ये, तुला दाखवतो, अशी धमकी दिली. बस वैजापूर स्थानकात पोहोचताच त्याचे तीन साथीदार बसमध्ये घुसले.

त्यांनी मोरे यांच्या गणवेशाची कॉलर पकडून शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. चालक पठारे, कर्मचारी विनोद पंडित व रफीक शेख यांनी मध्यस्थी करून मोरे यांची सुटका केली. प्रवाशाने आपले नाव बाबासाहेब पगारे असल्याचे सांगितले. जखमी मोरे यांनी वैजापूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यांना वैद्यकीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. भरदिवसा बस स्थानकात घडलेल्या या प्रकारामुळे एसटी कर्मचाऱ्यांमध्ये संताप असून, त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## दै. राष्ट्र सहयाद्रीच्या कामिका एकादशी विशेष पुरवणीचे नेवासा येथे प्रकाशन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : दैनिक राष्ट्र सह्याद्रीच्या वतीने कामिका एकादशी निमित्ताने काढण्यात आलेल्या विशेष पुरवणीचे प्रकाशन नेवासा येथे नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती व लोकनेते मारुतराव घुले पाटील पतसंस्थेचे चेअरमन नंदकुमार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कामिका एकादशी निमित्त काढलेल्या विशेष पुरवणीचे प्रकाशन प्रसंगी नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील,लोकनेते मारुतराव घुले पाटील पतसंस्थेचे उपाध्यक्ष महंमद शेख, संचालक विजय गांधी, कैलास बोरुडे, नगरसेवक डॉ.राहुल चव्हाण, ड. अभिजित पाटील, लक्ष्मण नाबदे, प्रा.रविंद्र चव्हाण, संदीप टेमकर, ज्ञानेश्वर उगले, विलास आरले, अरुण गायके, कोरेकर यांच्यासह पतसंस्थेचे कर्मचारी वारकरी उपस्थित होते. दै. राष्ट्र सह्याद्रीचे नेवासा तालुका प्रतिनिधी सुधीर चव्हाण यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.



## कोल्हार खुर्दच्या अमृता ज्वेलर्समध्ये चांदीच्या दागिन्यांचा अपहार

### महिला कर्मचाऱ्यावर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : कोल्हार खुर्द येथील अमृता ज्वेलर्सच्या शाखेत काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्याने दुकानातील चांदीच्या दागिन्यांच्या साठ्यात फेरफार करून सुमारे ४ लाख ४७ हजार ८१० रुपये किमतीच्या चांदीच्या दागिन्यांचा अपहार केल्याचा प्रकार समोर आला आहे.

याप्रकरणी लोणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सानिका.लक्ष्मीकांत जोशी (वय २०, रा. कोल्हार खुर्द, ता. राहाता, जि. अहिल्यानगर) ही अमृता ज्वेलर्सच्या कोल्हार खुर्द शाखेत सेल्सगर्ल व स्टॉक चेकिंगचे काम करीत होती. १० जून ते १५ जुलै २०२६ या कालावधीत तिने दुकानातील चांदीच्या दागिन्यांच्या साठ्याबाबत स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी विश्वासघात करून जाणीवपूर्वक स्टॉकमध्ये तफावत निर्माण केली. त्यानंतर स्टॉक बिलासंबंधी माहिती दिशाभूल करून चांदीच्या दागिन्यांचा अपहार केल्याचे पोलिस तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी लोणी पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३९०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नोंदीनुसार या प्रकरणात ४ लाख ७१ हजार ४० रुपये किमतीचा मुद्देमाल नमूद असून, त्यामध्ये वेगवेगळ्या वजनाचे चांदीचे जोडवे, तसेच चांदीचे विविध वजनाचे कॉईन यांचा समावेश आहे. जोडव्यांचे एकूण वजन १ किलो ८९३ ग्रॅम, तर कॉईनचे वजन १५५ ग्रॅम असल्याचे नोंदविण्यात आले आहे. लोणी पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि युवराज आठरे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. तपासी अंमलदार पोहेकॉ./११७९ आडंगळे हे प्रकरणाचा तपास करीत आहेत.

## प्रसाद शुगरमधील चोरीचे पितळी बुश हस्तगत

### तीन आरोपी जेरबंद । राहुरी पोलिसांची २४ तासांत कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : वांबोरी येथील प्रसाद साखर कारखान्यातून चोरीस गेलेला पितळी बुशचा संपूर्ण मुद्देमाल राहुरी पोलिसांनी धडाकेबाज कारवाई करत १०० टक्के हस्तगत केला. या प्रकरणातील तीन फरार आरोपींना २४ तासांच्या आत श्रीरामपूर शहर परिसरातून ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले असून, चौथा आरोपी कारवाईची माहिती मिळाल्याने फरार झाला आहे.

या प्रकरणी बबन सिताराम पागिरे (रा. वांबोरी) यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ८७२/२०२६, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. ६ ऑगस्ट रोजी कारखान्यातून पितळी बुश चोरीला गेल्याचे समोर आले होते. गुन्ह्यातील फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी राहुरी पोलिसांचे पथक ८ ऑगस्ट रोजी श्रीरामपूर शहर परिसरात रवाना झाले. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी कारवाई करत सोएफ युनूस शहा (रा. वॉर्ड क्रमांक २, श्रीरामपूर), कैसर निसार शेख (रा. वॉर्ड क्रमांक १, श्रीरामपूर) आणि मुत्तबिर युसुफ शहा (रा. वॉर्ड क्रमांक २, श्रीरामपूर) यांना ताब्यात घेतले.

त्यांच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने पुढील चौकशी सुरू आहे. दरम्यान, पोलिसांची कारवाई सुरू असल्याची माहिती मिळताच आणखी एक आरोपी घरातून फरार झाला. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिस पथक प्रयत्नशील आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलिस अधिकारी जयदत्त भवर व पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. हेड कॉन्स्टेबल अशोक झिने, संजय राठोड, पोलिस शिपाई सतीश कुऱ्हाडे, प्रमोद ढाकणे व नदीम शेख यांनी कारवाईत सहभाग घेतला. श्रीरामपूर परिसरात मनोज गोसावी, बडे, वाघमारे व माने यांनी सहकार्य केले. पुढील तपास राहुरी पोलिस करीत आहेत.

## कामिका एकादशीनिमित्त चांगदेव महाराजांच्या दर्शनासाठी शेकडो दिंड्यांची गर्दी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा** : महाराष्ट्राची दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र पुणतांबा येथे कामिका एकादशीनिमित्त रविवारी सुमारे दोन लाख भाविकांनी श्री चांगदेव महाराजांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेतले. गोदावरी नदीला पाणी असल्याने भाविकांना पवित्र स्नानाचाही लाभ मिळाला. चांगदेव महाराज व विठ्ठलाच्या जयघोषाने पुणतांबा परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. पंढरपूरच्या आषाढी एकादशीनंतर श्री चांगदेव महाराजांचे दर्शन घेतल्यास पंढरपूरची वारी पूर्ण होते, अशी श्रद्धा आणि परंपरा असल्याने कामिका एकादशीच्या यात्रेला विशेष महत्त्व आहे.

यानिमित्ताने अहिल्यानगर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आदी जिल्ह्यांतून शेकडो दिंड्या पुणतांब्यात दाखल झाल्या होत्या. शनिवारी रात्रीपासूनच हजारो भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. पहाटे तीन वाजता चांगदेव महाराज देवस्थानच्या वतीने महापूजा करण्यात आली. भाविकांना सुलभ दर्शन मिळावे यासाठी



देवस्थानच्या वतीने नियोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, बजरंग दल व विश्व हिंदू परिषद यांच्या कार्यकर्त्यांनीही दर्शन व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी सहकार्य केले. दिंड्यांमधून आलेल्या भाविकांसाठी भक्तजनांच्या वतीने भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

> १८० वा पुढील वर्षी होणारा संत गंगागिरी महाराजांचा अखंड हरिनाम सप्ताहाचा मान श्री क्षेत्र पुणतांबा येथे देण्यात यावा. अशी मागणी पुणतांबा व परिसरातील ग्रामस्थांनी केली. सन १९९६ साली पुणतांबा येथे सप्ताह झाला होता. तीस वर्षानंतर पुणतांबा येथे सत्ता व्हावा अशी इच्छा येथील नागरिकांनी, सरला बेटाचे महंत गुरुवर्य रामगिरी महाराज यांच्याकडे व्यक्त करण्यात आली.

यात्रेदरम्यान सरला बेटाचे महंत गुरुवर्य रामगिरी महाराज यांचे कीर्तन झाले. संत गंगागीर महाराजांनी सुरू केलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा पुढे नेत १७९ वा अखंड हरिनाम सप्ताह धनगरवाडी, ता. राहाता येथे होणार असल्याची घोषणा महंत रामगिरी महाराज यांनी केली. यावेळी सप्ताहाचे नारळ त्यांच्या हस्ते सप्ताह समितीकडे सुपूर्द करण्यात आले. कीर्तनातून रामगिरी महाराजांनी चांगदेव महाराजांचे चरित्र व त्यांनी केलेल्या चौदाशे वर्षांच्या तपश्चर्येचे विवेचन केले. कलियुगात नामस्मरणाला विशेष महत्त्व आहे.

हरिनामाचा जयजयकार करणे आणि संसाररूपी जीवनाचा आदर्श घडविण्यासाठी परमार्थ करणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी काशी विश्वेश्वर मंदिर, मुक्ताई ज्ञानपीठ तसेच दत्त मंदिरातही भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. कोपरगाव व श्रीरामपूर आगाराच्या वतीने भाविकांसाठी जादा बसेस सोडण्यात आल्या. ग्रामपंचायतीनेही यात्रेकरूंसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या.

राहाता पोलीस निरीक्षक दीपक सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. रामगिरी महाराजांच्या कीर्तनप्रसंगी माजी सरपंच मुरलीधर थोरात, माजी सरपंच सुधाकर जाधव, शेतकरी सेनेचे धनंजय जाधव, सामाजिक कार्यकर्ते छगनभाऊ जोगदंड, बंडू साबळे, दिनकर भोरकडे, विजय धनवटे, भोला उदावंत, राहुल धनवटे, भास्कर मोटकर, ग्रामपंचायत सदस्य भूषण वाघ, संजय डोके आदींसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निष्क्रिय अधिकाऱ्यांमुळे भावनांचा उद्रेक होतो : ना. विखे पाटील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**पारनेर** : अधिकारी निष्क्रीय होतात तेव्हा लोकांच्या भावनांचा उद्रेक होतो. प्रत्येक प्रश्नाला न्याय देण्याच्या भूमीकेतून काम करण्याचे निर्देश जलसंपदा तथा पालक मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिले. पारनेर तालुक्यात मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत टंचाई आढावा बैठकीचे आयोजन करणयात आले होते.आ.काशिनाथ दाते भाजपाचे अध्यक्ष राहूल शिंदे सुजित झावरे विश्वनाथ कोरडे अशोक सावंत यांच्यासह सर्व महायुतीचे पदाधिकारी आणि नागरीक उपस्थित होते. तालुक्यातील पाणी वीज रस्ते औद्योगिक वसाहतीच्या संदर्भात बैठकीमध्ये नागरीकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाची दखल घेवून मंत्री विखे पाटील यांनी संबंधित विभागांच्या अधिकार्यांना सूचना दिल्या. औद्योगिक वसाहती मधून तलावात सोडण्यात येणाऱ्या रसायनयुक्त पाण्याबाबत प्रांताधिकार्यांनी तातडीने चौकशी करून प्रदूषण नियंत्रण मंडळाला अहवाल पाठविण्यास सांगितले. जामगाव येथे टॅकरची मागणी असतान सुध्दा निर्णय होत नसल्याबद्दल गटविकास अधिकारी सोनकुसळे यांना मंत्री विखे पाटील यांना चुकीची माहीती दिली म्हणून मंत्र्यांनी कडक शब्दात ताकीत देवून तातडीने टॅकर सुरू करण्याच्या सूचना दिल्या. शहरातील रस्त्यांचे काम दुभाजक टाकूनच पूर्ण करावेत असे स्पष्ट निर्देश देताना पावसाच्या कारणाने रस्त्यामध्ये मोठ्या प्रमाणात पडलेले खड्डे तातडीने बुजवून नागरीकांची गैरसोय दूर करण्यास त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना सांगितले. तालुक्यातील सहा उपसा सिंचन योजनांना जलसंपदा विभागाने मंजूरी दिली आहे.यापैकी तीन योजनांना मुळा धरणातून पाणी उपलब्ध होत आहे.अन्य तीन योजनासाठी पाण्याची उपलब्धता करून देण्याबाबत लवकरच निर्णय होईल.त्यामुळे अनेक गावांचा पाणी प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले. पिंपळगाव जोगा धरणातून पाणी सोडण्याच्या सूचना विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या असून,चार्याच्या दुरुस्तीसाठी १०१कोटी रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता दिल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले. यापुर्वी तालुक्यात फक्त खंडणीराज होते.योजना फक्त कागदावर होत्या.फक्त बील काढण्याचे काम झाले.पण आता तालुक्याची परिस्थिती पूर्णपणे बदलत आहे.गुंडगिरी हद्दपार होवून विकासाची काम होत आहेत.आ.दातेच्या माध्यमातून अजून खूप काम होणार असल्याने निधी कमी पडणार नाही.नागरीकांनी ठेवलेल्या सर्व अपेक्षा पूर्ण करण्याची ग्वाही मंत्री विखे पाटील यांनी दिली. आ.काशिनाथ दाते यांनी आपल्या भाषणात अधिकाऱ्यांनी काम करण्याबाबत गांभीर्य दाखवावे. कामासाठी लोकांना चकरा मारायला लावू नका. वीज भारनियमनाच्या संदर्भात प्रश्न मांडून समस्या सोडविण्याची विनंती पालकमंत्र्यांना केली.